# नवकलिका



कुमारी शक्तिलीला (निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# नवकलिका

## निकिता राजेश पाटील

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# नवकलिका

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना दाद द्या

ई साहित्य ला आपल्या मित्रांचे मेल पत्ते द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# नवकलिका


## निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity.com
esahity@gmail.com
eternity, G1102,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : १७ ऑक्टोबर २०२१ (अश्विन शुक्ल द्वादशी शके १९४३)

©esahity Pratishthan®2021

○ विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
○ आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# परिचय



मी नवोदित लेखक नसून मी चंद्रिका, अस्मिता, विद्याविकास अशा मासिकांतून लेख, कथा, कविता, श्लोक इ. लिहिल्या आहेत.

डोंबिवलीच्या नाट्यमंचावर स्वरचित एकपात्री नाटक 'द्रौपदीचे स्वगत' हे नाटक सादर केले.याशिवाय मला संस्कृत भाषेतील श्लोक लेखनासाठी शाळेतर्फे 'अमृतकन्या गौरव' पुरस्कार मिळाला आहे.याखेरीज काही दिवसांपूर्वी मी मानवविद्या विभागात ' वाचनसंस्कृती' या विषयावर संशोधन केले आहे. मी सध्या बी.ए.मराठी साहित्य या शाखेत शिक्षण घेत आहे

# प्रस्तावना



परिकथा. बालपणीपासून ते आत्तापर्यंत मला परिकथेचे आकर्षण आहे. आणि का नसणार? परिकथा असतातच अद्भुत, विलक्षण,मायावी कधीकधी दिव्य. लहानपणी वाचलेल्या परीकथा वेगळ्या होत्या. पण त्यात कुठल्याही प्रकारच्या गांभीर्याचा आशय नव्हता. मात्र तरुणपणी वाचलेल्या परीकथा वेगळ्याच होत्या.

काही परिकथा प्रेमावर आधारित होत्या तर, काही परीकथा सुष्ट-दुष्टाच्या संघर्षावर आधारित होत्या. वेगळ्या विषयांवरच्या परिकथा म्हणजे मोठ्या माणसांकरिता असलेल्या परिकथाही सुंदर होत्या.

*मनुष्य आपल्या जीवनात काहीतरी अलौकिक, अद्भुत, विलक्षण शोधू पाहत असतो, लहानांपासून थोऱ्यामोठ्यांपर्यंतही. आणि तेव्हा ते अलौकिक, अद्भुत, विलक्षण असे काही परीकथेत गवसते.*

*‘ परी ' हा शब्द खरं पाहता, फारसीमधून आला आहे. ‘ परी' चा अर्थ चांगली किंवा वाईट देवदूतिका. मात्र नावाप्रमाणे परिकथा या फक्त परीवरच आधारित असतात असं नव्हे, तर विशिष्ट अद्भुत व अगम्य गोष्टींवर आधारित असतात. परिकथा या शब्दाचा उगम जरी अरबस्तानातून झाला असला तरी, भारतामध्ये प्राचीन काळापासून दिव्य, अद्भुत व विलक्षण कथांचे मूळ सापडते.*

*मी भारतीय परिकथा फारच कमी वाचलेल्या आहेत. माझ्या वाचनात पाश्चात्त्य, जपानी आणि अरेबिक परिकथा अधिकाधिक प्रमाणात आल्या आहेत.*

*त्यामुळेच माझ्या मनात भारतीय परीकथा लिहिण्याची प्रकर्षाने इच्छा निर्माण झाली. मात्र ती हितोपदेशाप्रमाणे बोधप्रदायक असायला हवी, असा माझा मानस होता.*

***या सर्व कथा माझ्या स्वरचित आहेत. या सर्व कथा मी संकलित केलेल्या नव्हेत.***

***परंतु परी हा फारसी शब्द असल्यामुळे मी या कथासंग्रहाला ' परिकथा' न संबोधणेच श्रेयस्कर मानले आहे. याउलट मी या कथासंग्रहातील कथांना ‘ दिव्य- अद्भुत कथा ' असे उल्लेखिले आहे .***

# नवकलिका

## दिव्य- अद्भुत कथा

\- ***निकिता राजेश पाटील***



## अर्पणपत्रिका

***माझ्या प्रेमळ, सुहृद व देवतेप्रमाणे तेजस्वी, सुंदर, अद्भुत आणि विलक्षण असणाऱ्या, माझी माता व गुरू असणाऱ्या माझ्या प्रिय जननीमाईला ह्या अद्भुत कथा अर्पण !***

# चमत्कारिक काचपात्र



एक आटपाट नगर होतं, तेथे एक राजपुत्र होता, त्याच्याकडे एक चमत्कारिक काचपात्र होते- त्या काचपात्रामुळे- अशी मी सुरुवात मुळीच करणार नाही. आता मी शेवटापासून आरंभ करणार आहे.

तर एके दिवशी श्रुतांगी नगरीत –

"पिताश्री, आजच मृगयेला जाण्याची गरज आहे का?"

"पुत्रा, क्षत्रियाचे रक्त आहे- शौर्याची तृष्णा असलेले.

म्हणून दिग्विजयानंतरही विश्रांतीऐवजी मृगया......"

"पिताश्री, मला वाटतं, आज मृगयेला न गेल्यास कुठली आपत्ती कोसळणार आहे? की आपल्या उद्यानातील दवणाची वेल येथून तेथे जाईल?"

"पुत्रा, आज पौर्णिमा आहे, महत्वाचा दिवस आहे. इंद्रधनुष्यी प्रकाश स्त्रवणारा रात्रपक्षी येणार आहे सुवर्णा नदीच्या तीरावर."

"त्या रात्रपक्ष्याला धरायचं आहे का? पण ते काचपात्र मंत्री दृश्यांकांनी हरवले आहे ना?"------

बेशुद्ध पडलेल्या श्रुतांगी नगरीच्या राजपुत्राला- सुधांशुला सारखं- सारखं हेच संभाषण आठवत होतं.

तो आपली मान हलवण्याचा प्रयास करू लागला. तेव्हा त्याला कळलं, त्याचं डोकं एका पाषाणाला टेकवून ठेवलेले आहे. त्याचे शरीर हिरवळीवर आहे.

अर्थातच हे सर्व जाणवूनही त्याला आश्चर्य वाटले नाही, कारण त्याला माहित होते की,तो त्याच्या पित्यासोबत सुवर्णा नदीच्या तीरावरच्या सुगम नावाच्या याच वनात आला होता.

पण अचानक त्याच्या लक्षात आले की त्याच्या शरीरात कुठल्यातरी अवयवात दुखरं आहे. कदाचित हात-पाय, मानेमध्ये.

हात-पाय व मान एकदम आखडून गेले होते. काही वेळापूर्वी जणू कोणी त्याचे हातपाय बांधून टाकले असावेत. काही क्षणांपूर्वी त्याच्या मानेला जणू लोंबकळत ठेवले असावे.

त्याने आपले केस झाडले, तसे त्याच्या केसांतून धूलिकण, वनस्पतीचे पाने बाजूला पडली. ते पाहून तो चकितच झाला. निश्चितच त्याच्यावर कोणीतरी आपल्या मायावी शक्तीद्वारे आक्रमण केले होते, अन् त्याला बांधून ठेवलेले होते.

परंतु त्याला कळले, आपण आता सुखरूप आहोत, सुरक्षित आहोत.

तेव्हाच त्याच्या चेहऱ्यावर पाण्याचे थेंब पडले. त्या थेंबांमुळे त्याला जणू चैतन्यच प्राप्त झाले. त्याच्या अचेतन शरीरात जणू जीवनरसाचा संचार झाला. त्याच्या देहातील थकवा, वेदना- यातना जणू पळूनच गेल्या.

त्याने त्या जाणिवेनेच डोळे उघडले. त्याने पाहिले, समोरच एक सुंदर युवती बसलेली होती. तिच्या चेहऱ्यावर पूर्णचंद्राचे कांती- तेज होते. तिचे डोळे फुललेल्या दवणाप्रमाणे होते, तर ओठ मधाच्या रंगाचे. तिच्या अंगावर रत्ना- मोत्यांचे अलंकार व चांदण्या जडवलेली सुंदर- निळ्या रंगाची पारदर्शक वस्त्रे होती.

अन् आश्चर्यकारक! एक आश्चर्यकारक बाब दिसली त्याला, या सुंदर तरुणीला दोन काळेभोर-निळेशार पंख होते, राणी पाकोळीला असावेत तसे!

शिवाय ती जेथे- जेथे अश्रू ढाळत होती, तेथे- तेथे रत्न निर्माण व्हायचे किंवा एखाद्या रोपाची वाढ व्हायची.

त्याच्या चेहऱ्यावर तिचेच अश्रू पडले होते. त्या अश्रूंमुळेच त्याला ऊर्जा, चैतन्य प्राप्त झाले होते.

हे कळताच तो अधिकच चकित झाला.

तो लगेच उठून बसला. त्याला आजूबाजूला वनस्पतीच्या पारंब्या तुटून पडलेल्या दिसल्या. याचाच अर्थ त्याला कोणीतरी पकडून ठेवलं होतं,परंतु त्याला कुणीतरी सोडवून आणलं होतं. त्याचं रक्षण या युवतीने केलं तर नसेल ना?

"कोण आहेस तू?" आपले लांब केस झाडत सुधांशुने विचारले, " अन् मी कुठे आहे?"

"राजकुमार, मी नवकलिका आहे." नवकलिकेच्या बोलण्याच्या शब्दशः अर्थ घेत सुधांशुने म्हटले, "कुठल्या फुलाची?"

“ नाही, मी कुठल्याही फुलाची कळी नव्हे. मी पाकोळ्यांची राणी अर्थात भावी राणी- राजकुमारी नवकलिका आहे.” नवकलिकेचे शब्द ऐकून सुधांशूला हसू फुटले, “ पाकोळ्यांतही राजा- राणी असतात का?”

“ होय, पाकोळ्यांवर अधिराज्य गाजवणारी नीलवंती असते. महाराणी नीलवंतीच्या वंशपरंपरेने मीही पाकोळ्यांची राणी होणार आहे. परंतु त्या दुष्ट श्वेतपंखी रुपस पक्ष्याने आम्हां फुलपाखरू - पाकोळ्यांचे जीवन संकटात टाकले आहे.”

“ तो रात्रपक्षी का? जो इंद्रधनुष्यी प्रकाश पाझरतो?” आपल्या फाटलेल्या उत्तरीयाने अंगावरील धूळ झाडत सुधांशूने उत्सुकतेने विचारले.

“ नाही, मात्र तो श्वेतपंखी रुपस पक्षी त्या दिव्य पक्ष्याचा मित्र आहे.”

“ नवकलिके ! तू त्या रात्रपक्ष्याविषयी काही जाणतेस का?”

“ मी इतकंच सांगू शकते, राजकुमार! तो रात्रपक्षी दिव्य आहे, साक्षात परमेश्वराचा दूत आहे, आकाशगंगेचा संदेशवाहक आहे. त्याला वशीभूत केल्यास संपूर्ण नगरीवर संकट कोसळू शकते. मात्र जर त्याला शरीरातून स्त्रवणारा इंद्रधनुष्यी प्रकाश आपल्याकडे ठेवून घेण्याची महत्वाकांक्षा असेल, तर नक्षीदार, चमत्कारिक काचपात्र त्यांच्यापुढे ठेवावे. त्याच काचपात्रालाच परमेश्वराचा आदेश मानून तो रात्रपक्षी प्रत्येक रात्री आपला दिव्य प्रकाश त्यात पाझरत असतो. ” नवकलिकेचे शब्द ऐकून तिच्याकडून

काचपात्राविषयी माहिती मिळवण्याच्या हेतूने सुधांशुने विचारले,” नवकलिके, ते काचपात्र कुठे मिळेल बरे?”

“राजकुमार, ते काचपात्र तुमच्या पित्याकडे होते.मात्र एकदा सहज वनविहाराला सुवर्णा नदीच्या तीरावरील या रहस्यमयी वनात आल्यानंतर तुमच्या मंत्रीने जलक्रीडेच्या वेळी सहज एका वृक्षाखाली ते पात्र ठेवले. त्या वृक्षाच्या खाली बिळात असलेल्या मण्यार सर्पाने ते काचपात्र धरुन नेले आणि सहजपणे की दुष्ट हेतूने किंवा कुतुहलापोटी श्वेतपक्षी रुपस पक्ष्याने ते काचपात्र पाहून ते चमत्कारिक काचपात्र आपल्या चोचीने फोडून टाकले.”

“आता?” सुधांशू भयभीत झाला.

“आता काय, राजकुमार?” नवकलिकेने विचारले. “बरं! ” नवकलिकेला त्याच्या प्रश्नांचा उलगडा झाला नव्हता, हे समजताच सुधांशूने म्हटले,“ नवकलिके, मला इतकंच सांग की, मी इथे कसा आलो? कुणी पकडलं होतं मला?”

“हे मात्र मी जाणू शकले नाही, अजूनपर्यंत. जोपर्यंत माझे हेर मला कुठलीही बित्तंबातमी देत नाही, तोपर्यंत तरी नाही.”

“हेर? तुझ्याकडे हेर आहेत?” सुधांशू अविश्वासाने म्हणाला.

“होय, माझ्या पाकोळ्याच माझे हेर आहेत.”

“काहीही! मनुष्याप्रमाणे पाकोळ्या हेरगिरी करू शकतात का?”

"कुमार सुधांशू, हे सुगम वन आहे. एक मायावी वन. या वनात फुलपाखरे, पाकोळ्याही वेळ पडल्यास मानवी रूप धारण करू शकतात आणि कीटकांच्या भाषेऐवजी मनुष्याच्या भाषेत बोलू शकतात." तिच्या शब्दावर अधिकच अचंबित झालेल्या सुधांशूला वाटले, आता हळूहळू प्रत्येक रहस्य उलगडत आहे.

"म्हणजे तूही पाकोळी आहेस? नवकलिके......."

"नाही, मी नीलवंताच्या प्रजातीतले एक फुलपाखरु आहे- जिचे पाकोळ्यांवर संपूर्ण नियंत्रण असते." नवकलिकेच्या अप्रतिम झळाळत्या सौंदर्याकडे पाहात सुधांशूने विचारले, " फुलपाखरू? तू फुलपाखरू आहेस?"

त्यावर तिने मान डोलावली.

"तूच माझे रक्षण केले होतेस?"

"हो, पाकोळ्यांच्या मदतीने मी अपहरणकर्त्याला भंडावून सोडले होते. इतकेच नव्हे, तर त्या व्यक्तीला त्रस्त करण्यासाठी गांधीलमाशा - मधमाशादेखील आल्या होत्या." नवकलिकेचे उत्तर!

" तू त्या अपहरणकर्त्याला पाहिले होतेस का?" सुधांशूला हाच प्रश्न महत्त्वाचा वाटला.

“ मी माझ्या आठही डोळ्यांनी त्याला पाहण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने आपला चेहरा एका शालीने झाकलेला होता. फक्त रात्रीच्याच वेळी चमकणाऱ्या लांडग्याच्या डोळ्यांप्रमाणे त्याचे डोळे होते, हेच मी पाहू शकले. राजकुमार!” तिने म्हटले.

“म्हणजे तो अयांशु होता? त्याचेच डोळे लांडग्याप्रमाणे दिसतात!” अयांशुचं नाव आठवताच सुधांशूला सर्व काही घटना भराभर आठवल्या.

अयांशु हा खरंतर सुधांशूचा जीवाभावाचा मित्र. मंत्रीराज दृशांकाचा पुत्र. लहानपणीपासून त्याची व सुधांशूची मैत्री होती. लहानपणापासून तारुण्याच्या काळापर्यंत ते एकत्र खेळले होते, एकत्र मृगया केली होती, एकत्र वनविहार केला होता तसेच शस्त्राभ्यासही.

तो जीवकंठश्च मित्र असं का करेल, याचीही कल्पना सुधांशूला होती;

जेव्हा मंत्र्याच्या हातून ते चमत्कारिक काचपात्र हरवलं होतं, तेव्हा राजा क्षेमकारणाने - अर्थात सुधांशूच्या पित्याने आपल्या मित्रासारख्या सल्लागार मंत्र्याला-दृशांकाला क्रोधाच्या भरात अपमानास्पद बोल सुनावले होते.

त्याच दिवशीच्या संध्याकाळी अयांशु सुधांशूच्या महालात आला होता. त्यानंतर त्या दोघांचे झालेले वाद-प्रतिवाद..........

“अयांशु! मित्रा! ते साधारण काचपात्र नव्हते. ते चमत्कारिक काचपात्र होते.”

“तरीही ती एक वस्तूच ना? तिच्याविषयी महाराजांना मोह का?”

“मोह नव्हे, पिताश्रींनी दिलेली काचपात्राची छोटी जबाबदारी मंत्रीराज सांभाळू शकले नाहीत, तर ते मोठी जबाबदारी कसे सांभाळू शकतील?”

“सुधांशू! वा! तूही आपल्या पित्याच्या चुकीचे समर्थन करतोस. अरे, माझ्या पित्याने कित्येक मोठमोठ्या जबाबदारी अधिक सक्षमपणे पेलवल्या होत्या, तरीही........”

सुधांशूलाही आपल्या पित्याचं असं उत्तेजनापूर्ण वागणं पटलं नव्हतं. तरीही तो आपलेच दात अन् आपलेच ओठ या उक्तीप्रमाणे आपल्या पित्याच्या चुकीवर पांघरून घालीत होता,“मात्र ते काचपात्र आमच्याकरिता किती महत्त्वाचं होतं!”

“असेल ते काचपात्र चमत्कारिक, दैवी; परंतु उत्तम सल्लागार व मित्रापेक्षा तुझ्या पित्याला त्या निर्जीव काचपात्राचे मोल अधिक महत्त्वाचं वाटलं?”

अयांशुच्या या तर्कापुढे सुधांशू निरुत्तर झाला होता व अयांशुही रागाने महालाबाहेर पडला होता.

पूर्वस्मृती सुधांशूच्या डोळ्यांसमोर तळरल्या. तसं त्याच्या खांद्याला हलवून नवकलिकेने विचारले, “राजकुमार, कुठल्या विचारांत आहात?”

तिचा आवाज ऐकून त्याच्या मनात एक शंका उद्भवलीच, ही फुलपाखरू म्हणजेच नवकलिकेने आपलं रक्षण का केलं? आताही ती आपल्या जखमांवर का उपचार करत आहे?

“पाकोळ्यांची राणी- महाराणी नीलवंतीची वंशदिपिका- नवकलिकादेवी यांचा त्रिवार जयजयकार असो व सहस्त्रवार धन्यवाद असो!” सुधांशूने नवकलिकेचे दोन्ही हात धरत म्हटले,”हे देवी, तुला अनंत धन्यवाद. तू फुलपाखरू असूनही माझ्या प्राणांचे रक्षण व जतन केलंस.अशा कारणाने तू देवदूतिका ठरली आहेस.”

हे ऐकून नवकलिकेच्या गोऱ्या- गोबऱ्या गालांवर लाजेची लाली चढली, “मी फक्त एक फुलपाखरू नव्हे, तर एका स्वर्गसुंदरीच्या तुटलेल्या नखाग्रातून जन्मलेला एक असा भाग्यवान जीव आहे, जो आपल्या इच्छेनुरुप मनुष्यरुप धारण करू शकतो. या दिव्यतेमुळेच मी हे सर्व करु शकले आहे आणि…….” आपले दोन्ही हाताने आपले मुखकमल झाकत ती म्हणाली, “आणि साह्य व प्राणरक्षणाविषयी म्हणाल तर…… त्यात मी एवढं काय मोठं केलंय? मी स्वतःचेच प्राणरक्षण केले आहे.”

“म्हणजे? याचा अर्थ मी काय समजावा?” सुधांशूच्या मनातील संशय बळावला.

“याचाच अर्थ हाच, आपण मला प्रिय वाटता.”

“मी तुला प्रिय वाटतो? ते कसे? आपण तर एकमेकांना जाणतही नाही. किंबहुना, मी तरी तुला पहिल्यांदाच पाहतो आहे. ‘नवकलिका' हे नावदेखील मी प्रथमतः ऐकले आहे.”

“राजकुमार, एकमेकांना जाणून घेऊनच प्रेम करावे असा जगतमान्य नियम आहे का?” तिच्या सडेतोड बोलण्याने सुधांशू सर्दच राहिला.

त्याचे ते मौन पाहून नवकलिका आपल्या भावनांतून सावरली, “म्हणजे मी तुम्हाला जाणत आहे, जरी तुम्ही मला जाणत नसला तरी.”

“ते कसे? नवकलिके....”

“पहिले कारण म्हणजे तुम्ही आमच्या नगरीचे राजकुमार आहात आणि दुसरे कारण म्हणजे.....” नवकलिका अडखळली.

“दुसरं कारण?” त्याने कठोर स्वरात म्हटले.

“दुसरं कारण हेच की, त्या स्वर्गसुंदरीने भविष्यवाणी केली होती, त्या चमत्कारिक काचपात्रामुळे आमच्या प्रजेच्या जीवाला धोका निर्माण होईल. म्हणून मी तुमच्याबद्दल जाणून घेण्याचे प्रयत्न केले.”

नवकलिकेच्या निरागस चेहरा पाहून व निष्पाप शब्द ऐकून सुधांशूचा तिच्यावर विश्वास बसला. किंबहुना विश्वास ठेवावा लागला.

“बरं,आपण त्या रात्रपक्ष्याला कसं धरावं?” सुधांशू मूळ मुद्द्यावर आला. “आणि इंद्रधनुष्यी प्रकाश कसा मिळवायचा?”

“राजकुमार, मी एक बोलू? तुम्हाला क्रोध येणार नसेल तर, मी तुम्हाला काहीतरी महत्वाचं सांगणार आहे.” नवकलिकेने म्हटले.

“बोल, माझे तुला अभयदान आहे.” सुधांशू म्हणाला.

“राजकुमार, लोभ कधीही वाईटच. जे काही आहे, त्यात समाधान मानणे हेच धर्माचारी व बुद्धिमान मनुष्याचे लक्षण आहे. नाहीतर मनुष्य आपल्या जवळचेही महत्त्वाचे काही गमावून बसतो. महाराज क्षेमकारणांनी चमत्कारिक काचपात्राच्या लोभामुळे आपल्याच मंत्रीला दुखावले. आता मंत्रीराज स्व-राज्यत्याग किंवा फितुरी, विद्रोहही करू शकतात. आपल्या लोभाच्या भरात महाराजांस या राजनीतीचीही विस्मृती घडली.” इतकं सारं बोलून झाल्यानंतर नवकलिकेने त्याच्याकडे निमिषमात्र पाहिले.

“तुझं म्हणणं उचित आहे, नि मला ते पटलंही आहे.” सुधांशूने गहन विचारांत असल्याप्रमाणे म्हटले.

“म्हणूनच रात्रपक्ष्याचा नाद सोडावा.” नवकलिकेने विनंती केली.

“नाही, पिताश्रीची आज्ञा आहे, तर रात्रपक्ष्याला पकडण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे.” सुधांशूच्या अशा निश्चयामुळे तिचा निरुपाय झाला.

सुधांशूच्या आज्ञेनुरुप नवकलिका त्याला श्वेतपंखी रुपस पक्ष्याच्या घरट्याजवळ घेऊन आली.

तेथेच श्वेतपंखी रुपस पक्षी बसला होता, त्याचाच बाजूला तोच रात्रपक्षी बसला होता- ज्याच्या मानेला सात रंगांचा तुरा होता. याचाच अर्थ, हाच रात्रपक्षी जो इंद्रधनुष्यी प्रकाश पाझरतो.

त्याच रात्रपक्ष्याला धरण्यासाठी सुधांशूने त्या पक्ष्यावर जाळे फेकले. मात्र ते जाळे नेमके श्वेतपंखी रुपस पक्ष्यावर पडले. त्यामुळे रात्रपक्ष्याचे आपोआपच रक्षण झाले.

श्वेतपंखी रुपसपक्षी त्या जाळ्यात फडफडत होता. त्या श्वेतपंखी रुपस पक्ष्याला सुधांशूने जाळ्यासकट ओढले. कारण त्याला आशा वाटत होती की, त्या श्वेतपंखी रुपस पक्ष्याच्या मागे असणारा तो रात्रपक्षी या जाळ्यात निश्चितच अडकला असणार.......

त्याने जाळे ओढले, आणि त्यामुळे रात्रपक्षी घरट्यातून खेचला जाऊन खाली पडला. त्याला कळलं, त्याने श्वेतपंखी रुपस पक्ष्याचे पारध केले आहे, रात्रपक्ष्याचे नव्हे.

तीच संधी साधून नवकलिकेने त्या श्वेतपंखी रुपस पक्ष्यावर सुधांशूची कट्यार फेकली. त्यामुळे श्वेतपंखी रुपस पक्षी मृत्युमुखी पावला.

श्वेतपंखी रुपस पक्ष्याच्या वध झाल्यानंतर सुधांशू व नकलिकेने त्या रात्रपक्ष्याला धरण्याचा प्रयत्न केला. तितक्यात पहाटेची पहिली किरणे धरतीवर पडली. रात्रपक्ष्याच्या शरीरावर ती किरणे तप्त किरणांप्रमाणे पडली. त्याच्या शरीराला ती किरणे जाळू लागली. त्यामुळे तो जळून गेला अन् त्याच्या मानेवर तुरादेखील.

“हेच कारण होतं.” त्या राखेकडे बोट दाखव नवकलिका म्हणाली, “रात्रपक्ष्याने श्वेतपंखी रुपस पक्ष्याशी मैत्री करण्याचं! श्वेतपंखी रुपस पक्षीच पहाटेच्या किरणांपासून त्या रात्रपक्ष्याचे रक्षण करु शकत होता.”

“तर तू त्या श्वेतपंखी रूपस पक्ष्याला का ठार केलेस?” त्याचा प्रश्न.

“माझं कर्तव्यच होतं ते, आपल्या प्रजेचे रक्षण करणं.” नवकलिकेचे स्पष्टीकरण.

हे ऐकून सुधांशू निराश झाला. मात्र त्याला या सर्व घटनाक्रमातून एक बोध मिळाला होता, की लोभ व अविवेक व्यक्तीच्या सर्वस्वाचे हरण करू शकतो, बुद्धी, संपत्ती, राज्याचेही.

“ठीक आहे, आता मी आपल्या राज्यात पुन्हा जाणार आहे. आता तू काय करणार आहेस, नवकलिके?” त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता की, तू माझ्यावर प्रेम केलेस, त्याचे काय?

“आता मी काय करू शकते, राजकुमार? मी आपल्या राज्यात म्हणजे सुगम वनात जाणार आहे.” असं म्हणून नवकलिकेने त्याचा हात धरत म्हटले, “आता माझे प्रेम सफल होणे शक्य नाही. मी राणी पाकोळी व तुम्ही मानव. म्हणून माझा- तुमचा विवाह संभव नाही.”

अशा तऱ्हेने निरोप दिल्यानंतर तिने फुलपाखराचं रूप धारण केलं नि ती उडत निघून गेली.

सुधांशू देखील आपल्या राज्यात परतला. त्याने आश्चर्यकारक दृश्य पाहिले, राजा क्षेमकारण व मंत्रीराज दृशांक एकमेकांशी हसत बोलत आहेत. त्याला प्रश्न पडला, या दोघांमध्ये सामंजस्य कसे निर्माण झाले?

“पिताश्री! तुम्ही इतके आनंदी का आहात?”

“का नसणार? शेजारच्या राज्याच्या म्हणजेच अंशुमती नगरीच्या नरेशाने- अंशुमानाने तुझ्याकरिता कन्यादान केले आहे व त्याच्यासोबत चमत्कारिक आरसाही. असा आरसा- ज्याच्यावर रत्नांचे प्रतिबिंब पडल्यास जो आरसा त्या रत्नांचा प्रकाश स्त्रवतो.” याच आनंदात पिताश्रींनी मंत्रीची क्षमा मागून त्यांचे मन वळवले असेल.

आपल्या पित्याचे शब्द ऐकून सुधांशूला वाटले, आता पिताश्री आपल्या मूळच्या स्वभावाप्रमाणेच नव्या मोहात फसलेले आहेत!

खरंतर या घटनेला पाच- सहा वर्षे तर उलटून गेली आहेत. तरीही प्रत्येक स्मृती किती उत्कटपणे जिवंत आहे, विशेषतः नवकलिकेची- त्या अनोख्या नीलवंतीची.

“कसला विचार करताहात, आर्य?” अचानक अंशुमानाच्या कन्येने- सुधांशूच्या पत्नीने- राजदीपेने पाठीमागून त्याच्या गळयात आपले हात टाकले.

“अगं, राजदीपा! हे पहा, फुलपाखरे किती सुंदर दिसताहेत!” सुधांशूने तिच्या गालांवरून हात फिरवला.

“आर्य, मलाही फुलपाखरे आवडतात. म्हणूनच मी वारंवार याच पुष्पवाटिकेत येत असते.” राजदीपा म्हणाली.

इतक्यात राणी पाकोळीसारखे दिसणारे नीलवंतीचे फुलपाखरू सुधांशुच्या हातावर येऊन बसले. तो म्हणाला, “मलाही तू आवडतेस. कारण तू आहेसच सुंदर.”

हे ऐकून राजदीपा लाजली. मात्र सुधांशुचे हे शब्द नवकलिकेला उद्देशून होते!

# शापित स्वयंवराचे रहस्य



ती रम्य संध्याकाळ होती. राजकुमारांच्या वनविहाराची हीच वेळ होती. सूर्याचा अस्त होण्याची हीच वेळ असते.

.........आणि हीच वेळ असते कुणाच्या तरी आशेचे किरण निस्तेज होण्याची!

राजकुमारी ऋत्विकेच्याही सर्वच आशा मावळण्याची हीच वेळ होती.

ती स्वयंवराची मंगलवस्त्रे धारण केलेल्या अवस्थेत होती. तिच्या अंगावर हिऱ्यांची आभूषणे होती. मात्र तिच्या हातात कंकणांऐवजी घट्टपणे बांधलेल्या दोऱ्या होत्या. तिच्या हातांतील कंकणे सैल होऊन, तुटून कधीच पडली होती.

इतकेच नव्हे, तर तिच्या शरीरालाही दोऱ्यांनी एका वृक्षाला बांधून ठेवलेले होते. ती स्वतःला सोडवण्याचे प्रयत्न करुन थकली होती. रडून-रडून तिला ग्लानी आली होती.

त्या ग्लानीच्या अवस्थेतही तिच्या डोळयांसमोर पहाटेपासूनचा प्रसंग घडलेला दिसला.

आज खरं पाहता, ऋत्विकेच्या स्वयंवराचा शुभ व पवित्र दिवस होता. आज पहाटेच ती शृंगार करत बसली होती.

ती आपल्या केसांच्या अंबाड्यातून केसांच्या काही बटा मोकळया सोडून त्या बटांच्या साहाय्याने वेगळी केशरचना करत होती. त्यानंतर तिने दवणाचे अन् गुलाबाचे गजरे केसांत माळून घेतले.

गजरे माळून झाल्यानंतर तिने नाजूक घडणावळीचे अलंकार निवडून घेतले.

अशा तऱ्हेने अलंकारांनी आभूषित झाल्यानंतर तिने आपल्या मस्तकावर फुलांची झिरझिरीत जाळी घेतली. आपली नथणी व्यवस्थित केसांत घालत तिने सहज आरशात पाहिले.

अचानक तिला आरशात तिच्या प्रियकराची प्रतिमा दिसली. तिचा प्रेमिक- सामंतपुत्र ओजवंत- त्याचेच आभासी प्रतिबिंब आरशात उमटले होते.

त्याचे प्रतिबिंब आरशात पाहून ती लाजली. तिच्या गालांवर गुलाबी छटा रेखल्या होत्या. तिच्या स्वप्नील डोळ्यांत तिच्या- त्याच्या गांधर्वविवाहाची किंवा राक्षसी विवाहाची रंगीबेरंगी स्वप्ने तरळत होती. तिच्या ओठांवर एक स्वप्नाळू, मधुर हसू उमटले होते. तिचे डोळे दिवास्वप्ने पाहत होते. ती तंद्रीतच हरवून गेली होती.

तिच्या महालाचे दार करकर वाजत उघडले, तसे तिच्या लक्षात आले की, ती प्रेमपत्र लिहिण्याचे विसरुनच गेली आहे.

तिने टाक उचलला व भूर्जपत्रावर आपल्या मनातील गुज लिहिणार, इतक्यात तिच्या महालात अपरिचित राजपुरुष प्रवेशला.

आरशात त्या अपरिचित राजपुरुषाचे प्रतिबिंब पाहून तिला आश्चर्य वाटले व भयही.

“कोण आहात आपण, महोदय?” तिचा स्वर थरथरता होता. ती आसनावरुन उठली. तिने हातांत भूर्जपत्र व टाक घट्टपणे धरुन ठेवले होते.

“ऋत्विके! मी लाजवंती नगरीचा राजकुमार रिवान्तक आहे. तू मला ओळखत नसलीस, तरी मी तुला ओळखतो. सर्वात सुंदर व बुध्दिहीन राजकन्येला कोणता राजकुमार बरे जाणत नाही?” रिवान्तकाचे शब्द ऐकून ऋत्विका रागावली, “मला हे मान्य आहे की मी सर्वात सुंदर आहे. पण बुध्दिहीन नव्हे. तुमच्या शब्दांचा काय आशय आहे?”

“राजकन्ये,अगं! इतके शूरवीर, सुदर्शन राजे-राजपुत्र असूनही, मित्रराज्यातही पराक्रमी युवकांची कमी नसूनही तू शत्रुराज्यातील सामंताच्या मुलाशी विवाह करण्याची योजना करून स्वतःच्या प्राणांना संकटात टाकत आहेस, तर आम्ही तुला बुद्धिमान कसं समजावं?” रिवान्तकाचा तर्क इतका भक्कम होता की तिला तो तर्क खोडून टाकता आला नाही. कारण तिच्या पित्याचाही असाच तर्क होता.

“हो, आहे मी बुद्धिहीन; ” ऋत्विका प्रतिवाद करू लागली, “पण प्रेमात प्राणांची पर्वा कधीच केली जात नाही.”

“परंतु सन्मानाची पर्वा करावी लागते ना?” रिवान्तक तिच्याजवळ येत म्हणाला.

"म्हणजे?" ऋत्विकेने तावदानातील दाणे टिपत असलेल्या पक्ष्यांपैकी एका पक्ष्याला पकडले आणि पाठीमागे लपवले.

"मात्र शत्रुराजा तुझी पर्वा करील का? तुझा विचार करेल का? तू ज्याला पती मानलंस, तो तर शत्रूराजाचाच सेवक आहे. जर शत्रुराजाने त्याच्याकडून तुला मागितले तर, तो ओजवंत त्याला नकार देऊ शकेल का? त्याचे प्रेम व त्याची राजाविषयी निष्ठा या द्वंद्वात राजनिष्ठाच जिंकणार." रिवान्तकाचा हा तर्कही खण्डित न करण्याजोगा होता.

"मी स्वतःचे, स्वतःच्या सन्मानाचे रक्षण करेन. मला शस्त्रविद्याही येते." ऋत्विकेच्या आवाजातील निश्चिंतता नाहीशी झाली होती. तिच्या स्वरात ठामपणा जाणवत नव्हता.

"याला आत्मविश्वास म्हणावे की वल्गना?" रिवान्तकाने तिच्या डोळ्यावरील आठ्यांकडे पहात आपले शब्द सौम्य केले, "तुला वाईट वाटले असेल, माझ्या शब्दांचं! परंतु जे सत्य आहे, तेच सत्य आहे."

त्याचा सौम्य आवाज ऐकून तीही सौजन्याने म्हणाली, "धन्यवाद, मला परिणामांची जाणीव करून दिल्याबद्दल. पण मी जोखीम पत्करायला तयार आहे." तिचा निश्चय अटळ होता.

“तर माझीही तात्कालिक कृती अटळ आहे!” त्याच्या हालचाली एकूणच संशयास्पद वाटत होत्या. त्याने आपल्या म्यान्यातील तलवार बाहेर काढली.

ते पाहून ऋत्विकेने झटकन कृती केली. भूर्जपत्रावर तिने ओजवंताकरिता संदेश लिहिला, “प्रिय ओजवंत,तू माझे रक्षण करायला ये. मीही स्वतः प्रयत्न करेन, स्वतःचे रक्षण करण्यासाठी. परंतु लाजवंतीचा राजकुमार रिवान्तकाची लक्षणे काही ठीक दिसत नाहीत. माझ्या प्राणांवर-सन्मानावर संकट आहे.

तुझीच प्रियतमा ऋत्विका.

ते पत्र कसं परस्पर पाठवावं, याच विचारांत असताना ऋत्विकेला आपल्या चतुर सखीची- वसंतसेनेची आठवण झाली.

“काय करतेस, पाठमोरी उभी राहून? मी तुझ्याजवळ येऊन तुझ्या मानेवर तलवार ठेवणार आहे, याक्षणीच. सावधान, राजकुमारी!”

कबुतराच्या पायाच्या नखीला ते पत्र बांधून तो कबूतर पाठीमागे लपवत ऋत्विका म्हणाली, “थांबा राजकुमार! मीदेखील तयार होत आहे. वसंतसेने, माझी तलवार आण!”

"पाहू दे, या नाजूक मनगटात किती बळ आहे ते!" असे म्हणून त्याने तिचे मनगट धरले. तिने आपले मनगट सोडविण्याचे प्रयत्न केले. त्या प्रयत्नांतच तिची कंकणे तुटली व सैल असलेले जड गोठ जमिनीवर पडले.

शेवटी तिने आपले मनगट सोडवून घेतले. तिने आपले मनगट सोडवून घेतले की त्याने तिचे मनगट सोडले, हे कळण्याच्या आतच वसंतसेना तेथे आली. तिच्या हातांत तलवार होती.

" ऋते? काय झालं?" तिने पाहिले की रिवान्तकाने ऋत्विकेच्या मानेवर तलवार ठेवली आहे.

"लाजवंतीच्या राजकुमारा!" वसंतसेना कडाडली, "तू आपल्या मर्यादेतच राहा. तुला माहीत नसेल, आमचं सैन्यबळ किती विशाल आहे!"

"तू वसंतसेनाच ना? तुला माहित नसेल कदाचित, हे कार्य मला महाराजांनीच दिले आहे." रिवान्तकाच्या शब्दांनी ऋत्विकेला धक्का बसला असला, तरी वसंतसेनेला याची कल्पना होती.

ती ऋत्विकेला तलवार देत तिच्या कानात कुजबुजली, "तुझे कार्य सिद्धीस गेले आहे. तू चिंता करू नकोस."

"काय?" ऋत्विकेने नजरेनेच केलेला प्रश्न वसंतसेनेने जाणला आणि...... आपल्याच नखीने ऋत्विकेच्या हाताला जखम करून कबूतर कसातरी भुर्रकन उडून गेला.

"हे कसले दु:साहस आहे?" ऋत्विकेने जखमी हाताने तलवार परजत म्हटले. तेव्हा रिवान्तकानेही त्या तलवारीवर आपली तलवार आदळली. तशा ठिणग्या झडल्या.

तितक्यात तिची फुलांची जाळी तावदानामध्ये अडकली. जशी ऋत्विका ती जाळी काढण्यासाठी वळली, तसा त्याने तिचा तलवार धरलेला हात धरून खेचला.

त्याने तिचा हात खेचताक्षणी ऋत्विकेच्या मस्तकावरची फुलांची जाळी फाटली. तिच्या हाताला, केसांना अन् डोक्याला झटका बसला आणि तिला आपला तोल सावरता आला नाही.

तिला सावरण्यासाठी वसंतसेना धावत आली, मात्र रिवान्तकाने एका विशिष्ट रत्नांची साखळी तिच्या गळ्यात टाकली.

डोळ्यावर अंधारी येण्यापूर्वी वसंतसेनेने विचार केला, ही साखळी महाराजांनी त्याला दिली असेल का?..... आणि वसंत सेना उभ्याउभ्या कोसळली.

"वसंतसेना........" त्या साखळीचे रहस्य जाणणारी ऋत्विका जशी वसंतसेनेकडे धावली, तसा रिवान्तकाने तिचा हात खेचून तिला आपल्याजवळ ओढली.

लगेच ऋत्विकेने त्याच्या मानेवर तलवारीने वार केला. त्यामुळे रिवान्तकाच्या मानेला जखम झाली व त्यातून रक्त टपकले.

स्वतःचं रक्त सांडलेलं पाहून तो संतप्त झाला. त्याने तिच्या हातावर दोनचार वार करून तिची तलवार पाडवली.

तिला निःशस्त्र पाहून तिला प्रतिकार करण्याची संधीही न देता त्याने ऋत्विकेला उचलून तिला खांद्यावर टाकलं व तो आपल्या रथाच्या दिशेने धावू लागला.

तरीही ती त्याला विरोध करत होती, त्याच्याशी झगडत होती. त्याच्या छातीवर लाथा झाडत होती, त्याच्या पाठीवर ओरबाडत होती. आपल्या परीने जसा जमेल, तसा ती विरोध करत होती.

तिचा तो प्रतिकार पाहून त्याने तिला खाली उतरवले आणि रथाजवळ तिला ओढतच नेले. तेव्हा तिने त्याच्या हाताचा चावा घेतला. त्याने एक हात सोडला व दुसऱ्या हाताने तिला धरले.

“सोड मला, रिवान्तक!”

“नाही सोडणार, ऋत्विके!” असे म्हणून त्याने ऋत्विकेला रथात उचलून ठेवले व तो स्वतःही बसला.

त्याच्या पोलादी हाताचा विळखा ऋत्विकेच्या कमरेला घट्टपणे आवळला होता. ऋत्विका त्या हाताचा विळखा सोडवण्याचे प्रयत्न करू लागली, पण व्यर्थ! तिला ते शक्य होईना.

तिने रिवान्तकाच्या कंठहाराला धरुन त्याच्या कंठाच्या धमन्यांना पीडा देण्यास सुरुवात केली. ते पाहून त्याने आपला कंठहारच काढून टाकला.

तर तिने आपल्या दोन्ही हातांनी त्याचा कंठ धरण्याचा प्रयत्न केला. पण लगेच त्याने आपल्या दुसऱ्या  हाताच्या मुठीत तिचे दोन्ही हात पकडले.

त्याची ती मजबूत पकड जाणवून तिने प्रतिकार करायला सुरुवात केली. तिने त्याच्या हाताचे चावे पुन्हा घेतले. ती त्याच्या पायावर स्वतःचा पाय दाबून ठेवू लागली.

तिच्या प्रतिकारामुळे, तसेच विरोधामुळे त्याला राग आला, तो संतापाने खवळला व त्याने रागाच्या भरात आवेगाने तिला ढकलून दिले.

त्याच्या क्रोधाचा आवेग अधिक होता. त्यामुळे ती रथाच्या स्तंभावर जाऊन कोसळली. परिणामी तिच्या कपाळाला खोक पडली आणि तिच्या कपाळातून रक्त वाहू लागले.

ऋत्विकेने आपल्या हारातील हिरा काढून रिवान्तकावर फेकला. त्या कठोर हिऱ्याने रिवान्तकाच्या छातीवर एक भयानक ओरबाडा पाडला.

रिवान्तक रागाने उठून काहीतरी कृती करणार इतक्यात, ऋत्विका बेशुद्ध होऊन कोसळली.

काही क्षणांत ऋत्विकेला शुद्ध आली तेव्हा तिला कळले, तिला एका तालवृक्षाच्या कडक- टणक बुंध्याला बांधून ठेवलेले आहे. त्या दोऱ्यामुळे तिच्या हाताच्या नाजूक तळव्यांना जखमा झाल्या होत्या.

वृक्षाचा टणक बुंधा कमरेला टोचत होता. तिचा श्वास फुलत होता. तिला प्रचंड भूक लागली होती. परंतु तिला तिच्या मानसिक यातनांपुढे तिची भूक काहीच वाटत नव्हती.

तिने मोठ्या कष्टाने डोळे उघडले. तिने पाहिले, तिचे अपहरण करणारा रिवान्तक आपल्या मित्रांसमवेत वनभोजन करत होता.

अजूनपर्यंत ओजवंत कसा आला नाही? आणि वसंतसेनेवरील नियंत्रण नाहीसं झालं असेल का? ओजवंतापर्यंत आपला निरोप पोहोचला असेल का? आता आपलं काय होणार? आपल्याला रिवान्तकासोबत लाजवंती नगरीतच जावं लागणार का?

नाही, नाही! असं म्हणून ती स्वतःला धीर देत होती. तिच्यातील मन मरू पाहत होते, तरी तिची आशा मरता मरता मरत नव्हती. तिच्या आशेचा तंतू कमजोर झाला होता, मात्र अजूनही तुटलेला नव्हता.

तिच्या नाजुक व लालचुटूक कपाळावर मोत्यांच्या लडीप्रमाणे घामाचे थेंब उमटले होते. तिच्या मनात भय, आशंका व अनिश्चितता दाटली होती.

तिचे ओठ कोरडे पडले होते. ती वारंवार ओठांवर जीभ फिरवत होती. मनातली अस्वस्थता चेहऱ्यावर उमटल्याशिवाय राहत नव्हती.

ती आपल्या हातातील दोरखंड तोडण्याचे, त्यातून स्वतःला सोडवण्याचे प्रयत्न करू लागली. परंतु तिचा एकही प्रयत्न यशस्वी झाला नाही.

तिचे ते असफल प्रयत्न पाहून रिवान्तकाला हसू फुटले.

त्याचे हास्य पाहून तिला वाटले, नियतीच तिच्या या स्थितीवर हसते आहे........

या विचारानेच तिचे डोळे भरून आले. ती हमसून रडू लागली. ती हुंदके देऊ लागली.

तिला रडताना पाहून रिवान्तकाला दया आली. मात्र त्याने आपल्या दयेला नियंत्रणात ठेवले.

त्याने आपले वनभोजन पूर्ण केले आणि तिला ग्लानी आलेली पाहून त्याने तिच्या दोऱ्या सोडल्या.

त्याने तिला उचलून घेतले. ती ग्लानीत होती, त्यामुळे ती आता काहीच प्रतिकार करत नव्हती.

तो तिला घेऊन रथाच्या दिशेने चालू लागला. तितक्यात त्याला दिसले, रथाच्या जवळ वसंतसेना उभी होती व तिच्या शेजारी ओजवंत. त्याच्या हातात तीच साखळी होती, ज्या साखळीने वसंतसेनेला नियंत्रित केले होते.

साखळीच्या बंधनातून मुक्त झालेल्या वसंतसेनेला पाहून रिवान्तक घाबरला. त्याने ऋत्विकेला टाकून दिले आणि त्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला.

मात्र तो पळू शकला नाही. कारण तो बांधला गेला होता, वसंतसेनेच्या अग्निलहरींच्या पाशात. त्याला पाशबध्द पाहून ओजवंत धावतच आपल्या प्रेयसीजवळ गेला. त्याने ऋत्विकेच्या चेहऱ्यावर पाणी शिंपडले अन् तिचे डोके आपल्या मांडीवर घेऊन तो तिच्या चेहऱ्यावरून हात फिरवू लागला. त्याच्या स्पर्शाने ऋत्विकेला शुद्ध आली. ती ओजवंताचा हात धरत म्हणाली, “ओजवंता ! तू आलास?” त्याने तिला प्रतिसाद दिला, “होय प्रिये! तुझे हरण करणाऱ्या रिवान्तकापासून तुझे रक्षण करण्यासाठी मी

आलो आहे.” हे ऐकून ऋत्विकेचे माथे भडकले. ती उठून बसली, “तू खूपच उशीर केला आहेस!” ऋत्विकेने रोषाने म्हटले.

“प्रियतमे,तू आपला राग सोड. कारण माझ्याकडे हा संदेश उशीराच आला. याशिवाय वसंतसेनेला त्या रत्नांच्या साखळीच्या बंधनातून मीच मुक्त केले.” ओजवंत आपल्या चुकीला दडवण्याची कारणे सांगू लागला.

“पुरे, ओजवंत! मला आता कळले,रिवान्तक मला योग्य तेच सांगत होता! मी तुझ्याशी विवाह करून माझ्या सन्मानाला, अब्रूला, प्राणांना व कुलाच्या प्रतिष्ठेला संकटात घालू इच्छित नाही.”

“प्रियतमे, तुझा माझ्यावर विश्वास नाही?” ओजवंताने तिचा स्कंध धरुन विचारले.

“होता, मात्र आता नाही. अपहरणवेळी तू केलेली हलगर्जी निश्चितच क्षम्य नाही. मी पाठवलेला संदेश तुला उशिराने प्राप्त झाला असेल, मात्र वसंतसेनेने तर पूर्वीच संदेश दिला होता ना? तो संदेश तुला पहाटेच मिळाला असेल ना?” ऋत्विकेच्या शब्दांवर तो गप्प राहिला.

“म्हणूनच मी हा निर्णय घेत आहे की, मी तुझ्याशी किंवा रिवान्तकाशी विवाह करणार नाही. कारण मी जर तुला वरले तर, शत्रूराजाने तुझ्याकडे माझी मागणी केल्यास तू माझे रक्षण करू शकणार नाही आणि रिवान्तकाने माझे अपहरण केले होते.” ऋत्विका ओजवंताने दिलेले पाणी पीत

म्हणाली, “याशिवाय माझा दुसरा निर्णय असा आहे की माझं स्वयंवर उद्या होईल. तेव्हाच मी माझा वर निवडेन. फक्त ही अपहरणाची बातमी फुटता कामा नये.”

“नाही फुटणार!” तितक्यात तिच्या पित्याचा- राजा ऋतवानाचा आवाज आला,” कन्ये! मी हे अपहरण विचारपूर्वकच घडवून आणले होते. तुझ्या व कुलाच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल असे माझे मुळीच प्रयोजन नव्हते. म्हणूनच मी उद्या सर्व राजे-राजकुमारांना येण्याचे निमंत्रण धाडले होते.”

“तर आजचं काय?” ऋत्विका आश्चर्याने म्हणाली.

“ती फक्त आवई होती. मी उडवून दिलेली!” ऋतवानाचे लक्ष आपल्या पुत्रीच्या कपाळातील जखमेकडे गेले, “हे काय, तुझ्या मस्तकावर जखम?”

“महाराज, मी सांगतो.” वसंतसेनेच्या पाशात अडकलेला रिवान्तक पुढे झाला, “ऋत्विकेने तलवारीने माझ्याशी दोन हात केले होते. तेव्हा तिच्या कपाळाला व हातांना जखम झाली. तुम्हाला ज्ञात आहे ना, माझं क्रोधावर नियंत्रण राहत नाही ते! त्यामुळे......”

“मला अभिमान आहे, माझ्या पुत्रीवर!” ऋतवानाने ऋत्विकेच्या खांद्यावर हात ठेवला, “ तूही काही कमी जखमी झाला नाहीस, यावरूनच माझ्या पुत्रीचे शौर्य दिसून येते!’

”वसंतसेने!” ऋतवानाने वसंतसेनेला आदेश दिला, “तू रिवान्तकाला पाशमुक्त कर.”

वसंतसेनेने रिवान्तकाला पाशमुक्त करताक्षणी ओजवंताने अचानक म्हटले, “मला ऋत्विकेचा प्रस्ताव मान्य आहे. मी जर ऋत्विकेशी विवाह केला तर, विश्वविहन्त महाराजांचा मला नाहक रोष पत्करावा लागेल. म्हणून मीही ही जोखीम पत्करत नाही.” त्याचे शब्द व्यवहारिक व रास्तच होते.

अशाप्रकारे परिस्थितीचा योग्य प्रकारे समन्वय साधला गेल्यानंतर ऋत्विकेचे स्वयंवर दुसऱ्या दिवशी आयोजित करण्यात आले.

तिच्या सूचनेनुसार ऋतवानाने तिच्या स्वयंवरमंडपाची सजावट इतकी भव्य केली नव्हती. रत्नांपेक्षा फुलांच्या सजावटीवर जास्तीत जास्त भर दिला होता.

स्वर्णिम नक्षीदार पडद्याऐवजी वेगवेगळ्या रंगसंगतीचे पडदे लावले होते. छताला चांदवा जडवलेला होता.

मुख्य मंचावर अन् अन्य ठिकाणी सोन्या- चांदीची रत्नजडीत आसने मांडलेली होती. त्याच आसनांवर देशोदेशीचे राजे- राजकुमार बसलेले होते.

मुख्य मंचावर तिचे मातापिता- महाराजा ऋतवान व महाराणी ऋतावरी आसनस्थ झाले होते. दशग्रंथी ब्राह्मणांच्या सुक्तपठणाच्या विधीनंतर ऋतवानाने म्हटले, “हे देशोविदेशीचे राजे -राजकुमारहो! आपण सर्व पराक्रमी क्षत्रियगण माझ्या कन्येच्या स्वयंवराला एकत्रित झाला आहात. तेव्हा आपणा सर्वांचे स्वागत असो. काही क्षणांत माझी सुपुत्री ऋत्विका या मंडपात प्रवेशलेच.”

त्याच्या स्वयंवरघोषणेनंतर काही क्षणांत पहारेकऱ्यांनी वर्दी दिली, “सौभाग्यकांक्षी, अत्यंत लावण्यवती व शस्त्रास्त्रविद्यानिपुण असलेल्या तसेच महीदीप नगरीच्या राजकन्येचे- ऋत्विकेचे आगमन होत आहे.”

पहारेकऱ्यांचे शब्द पूर्ण होतात न् होतात, राजकुमारीचा मेणा स्वयंवर मंडपात आला.

आरशांच्या चौकोनी तुकड्यांच्या आणि मोत्यांच्या माळांनी सजलेल्या मेण्यातून राजकुमारी ऋत्विका अन् तिच्या सख्या- अलोलिका ,नव्या व वसंतसेना उतरल्या.

ऋत्विकेच्या पैंजणांतील घुंगरांचा आवाज ऐकून सर्व राजकुमारांच्या नजरा तिच्याचकडे वळल्या.

मुळातच सुंदर दिसणारी ऋत्विका सुवर्णालंकारांमध्ये अधिकच सुंदर दिसत होती. चांदीचे जरीकाम केलेले व किरमिजी- गडद लाल रंगांची

रंगसंगती असलेले मंगलवस्त्र तिने धारण केलेले होते. तिच्या हातांत सुगंधित फुलांची रत्नजडित वरमाला होती.

ती सावकाश मंचावर आली. तिने सर्वांना प्रणाम केला. तसा राजा ऋतवानाने स्वयंवराचा शुभारंभ करण्याची उजव्या हाताने अनुमती दिली.

त्या संकेतानुसार वसंतसेना ऋत्विकेला प्रत्येक राजपुत्राचा परिचय देऊ लागली.

“हा निधिमित्रा नगरीचा राजकुमार शार्दूलान्वय,ज्याने विविध युद्धामध्ये विजय मिळवला आहे.

“हा सृतिदेशाचा राजपुत्र विहंग, नावाप्रमाणेच हा राजकुमार राजनीतीतदेखील दूरदर्शी आहे.”

वसंतसेना सांगत होती व ऋत्विका पुढेपुढे सरकत होती, कुणाही राजपुत्राकडे न पाहतां. तिचा निःशब्द नकार त्या राजपुत्रांना निराश करत होता. कोणी राजकुमार राजबिंडा होता, तर कोणी पराक्रमी, धर्मज्ञ किंवा राजकारणी. तरीही राजकन्या त्यांच्यापैकी कोणालाही वरू पाहत नव्हती.

“हा सहस्विका नगरीचा राजकुमार ऋतुंभर, ज्याने यंत्रनिर्मितीत प्राविण्य मिळवले आहे.”

हे ऐकून ऋत्विकेला वाटले, हा योग्य वर आहे. कारण सर्व राजपुत्रांमध्ये याचीच क्षमता वेगळी आहे.

ऋत्विकेने नजरही न वर उचलता ऋतुंभराच्या कंठात ‘यंत्रवत’पणे माला घातली. तिच्या डोळ्यांपुढे अजूनही ओजवंत तरळत होता.

डोळ्यातील ओजवंताची प्रतिमा धुसर होतां- होतां तिच्या अंगावर फुलांचा वर्षाव होत असल्याचे तिला जाणवले. भानावर येत तिने अलगद नजर उचलली. तिने पाहिले, ऋतुंभर विशेष देखणा नव्हता. त्याच्या शरीरावर ना पराक्रमाच्या खुणा होत्या, ना त्याच्या चेहऱ्यावर धर्मज्ञतेचे तेज. मात्र त्याच्या चेहऱ्यावर अपार आनंद नक्कीच होता.

तिने आपली नजर पुन्हा खाली वळवली. तिची मर्यादाशीलता पाहून ऋतुंभर मनोमन प्रसन्न झाला. त्याने तिलाही वरमाला घालत म्हटले, “महाराज ऋतुवान! माझं सुभाग्य आहे की राजकुमारी ऋत्विकेने मला वरलं.” त्याच्या स्वरात सौजन्यापेक्षा अधिक आश्चर्य अन् आनंद होता.

“मला वाटतं, तुम्हा दोघांचा विवाह यथावकाश पार पाडला पाहिजे.” अशा प्रकारे स्वयंवरसभेची सांगता करून ऋतुवानाने आपल्या कन्येला व जावयाला म्हटले, “तुम्ही दोघेही विवाहाच्या मंगलवेदीजवळ जा, काही क्षणांतच त्या विवाहवेदीची प्राथमिक पूजा तुमच्या हस्ते संपन्न होईल.”

“आणि दोन-चार दिवसांत विवाहदेखील.” महाराणी ऋतावरीने पुष्टी जोडली.

त्या दोघांच्या आज्ञेनुरुप ऋतुंभर व ऋत्विका विवाहवेदीपाशी गेले. काही क्षणांत त्यांच्या पाठोपाठ तिच्या सख्याही आल्या.

ऋत्विकेने आपल्या सख्यांकडे पाहिले. त्या सर्वजणींचे डोळे भरले होते. विशेषतः वसंतसेनेच्या चेहऱ्यावर पश्चाताप होता. तिच्या हातात तीच रत्नाची साखळी होती व दुसऱ्या हातात अणकुचीदार कठीण हत्यार.

याचाच अर्थ, वसंतसेना ती साखळी तोडण्याचा विचार करत होती! ऋत्विकेला ह्याचाच अंदाज आला.

म्हणून वसंतसेनेशी एकांतात बोलले पाहिजे, या विचारानेच ऋत्विका ऋतुंभराला चाचरत म्हणाली, “राजकुमार, मी माझ्या सख्यांसमवेत काही क्षणांकरिता एकांतात……”

“बोलू इच्छितेस ना, राजकन्ये? जशी तुझी इच्छा.” ऋतुंभराने तिचा संकोच दूर केला.

त्याची संमती मिळताच ती आपल्या सख्यांसमवेत विवाहवेदीपासून दूर गेली.

“काय झालं, सखे? तू आम्हाला येथे आणलंस?” अलोलिकेने विचारले.

ऋत्विका प्रश्नाचे उत्तर देणार, इतक्यात अचानक वसंतसेना ती रत्नांची साखळी तोडू लागली, त्या कठीण हत्याराच्या साह्याने.

परंतु तिचे सर्व प्रयास विफल ठरले.

हे पाहून ऋत्विका स्तंभित झाली.

"ती साखळी का तोडतेस, वसंतसेने?" ऋत्विकेने विचारले.

"याच साखळीमुळे तुझे स्वयंवर शापित ठरले. इच्छा असूनही तू तुझ्या प्रियकराला वरू शकली नाहीस. याच साखळीमुळे तुला विचार न करताही कोणी एका अपरिचित राजपुत्राला आपलं मानून त्याच्याशी विवाह करावा लागला." वसंतसेना म्हणाली.

"काय?" ऋत्विका किंचाळलीच, " मी पहिलं रहस्य जाणते आहे, पण दुसरं रहस्य?"

ते ऐकून अलोलिकेने आश्चर्याने विचारले, " सखे, पहिले रहस्य?"

"त्या रत्नांच्या साखळीमुळे माझं अपहरण झालं होतं." एक आश्चर्यकारक खुलासा तिने केला,"अलोलिके! प्रिय सखे! वसंतसेनेला एका वृद्धेकडून अग्निलहरींची शक्ती प्राप्त झाली होती आणि त्या शक्तीवर नियंत्रित करणारी विशिष्ट रत्नांची एक साखळी मिळाली होती. ती विशिष्ट रत्नाची साखळी सदैव माझ्या पित्याकडे किंवा माझ्याकडे असते. तीच साखळी पिताश्रींनी रिवान्तकाला दिली असेल. त्यामुळे रिवान्तक त्या साखळीच्या साहाय्याने संध्याकाळपर्यंत वसंतसेनेला आपल्या नियंत्रणात करु शकला. मात्र संध्याकाळनंतर........."

“मात्र काय, ऋत्विके!” नव्या या सखीने विचारले.

“नव्ये, संध्याकाळनंतर त्या रत्नांची शक्ती निस्तेज होते आणि वसंतसेनेचे सामर्थ्य वाढते. त्याकारणेच वसंतसेना चंद्रोदयाच्या वेळी आपल्या बंधनातून मुक्त होऊन ओजवंतासह माझे रक्षण करण्यासाठी आली.”

असं म्हणून ऋत्विकेने पहिल्या रहस्याचा उलगडा केला.

“तर दुसरं रहस्य काय आहे?” अलोलिका म्हणाली.

“रहस्य हेच की, त्याच रत्नांच्या साखळीमुळे आपले राज्य- महीदीप नगरी व  शत्रूराज्य- तमोमणी नगरी या दोन्ही नगरींमध्ये शत्रुत्व झाले होते.” वसंतसेनेचे शब्द ऐकून ऋत्विकेला धक्काच बसला,“ हे काय सांगतेस?”

“हे अगदी खरं आहे, सखी! मंत्रवर्धन नावाच्या पर्वतावर एक वृद्धा राहत होती. ती वृद्धा निश्चितच दिव्य शक्तींची धनी असेल. ती एका विचित्र आकाराच्या झोपडीत राहत होती. तिच्या झोपडीचा आकार साग वृक्षाच्या पानासारखा होता. मला वाटतं, तिच्या झोपडीकडे लोक फिरकत नसत. ते कदाचित तिला मांत्रिक समजत असतील. मात्र ती लोककल्याणासाठी तप करून विशिष्ट शक्ती प्राप्त करत असेल आणि योग्य असलेल्या व्यक्तीला सोपवत असे. मी त्या पर्वतावर तुझी प्रिय फुले- नीलघंटीची फुले

आणायला गेले होते. तर तेथे त्या वृद्धेला भेटायला शत्रूराजा विश्वविहन्त राजाही आला होता.''

''तो कशासाठी आला होता?'' अलोलिकेचा प्रश्न.

''ते मला माहित नव्हतं. मला संशय आला होता. मी तसे न दाखवता नीलघंटीची फुले तोडू लागले. तितक्यात मला एक बालिका रडताना दिसली. तिच्या हाताला एक सर्प दंश करू पाहत होता. मी तिचे प्राणरक्षण केले, तेव्हा त्या कन्येचे रुपांतर  एका वृध्देमध्ये झाले. मी चकितच झाले, तशी ती वृध्दा म्हणाली, ''तू घाबरू नकोस. मी हिरण्यसर्वा आहे. मी असीम शक्तींची धनी आहे. मी माझ्या शक्ती योग्य व्यक्तींकडे सोपवत असते. आणि तू अग्निलहरींची शक्ती प्राप्त करण्यासाठी पात्र आहेस. मी काही बोलणार, इतक्यात तिने एक दिव्य चूर्ण माझ्यावर फेकले. मला ठसका लागला. काही क्षणांनी मला जाणवले, माझ्या शरीरातील उष्णता वाढली आहे. माझे हात आखडले आहेत. माझे डोळे पेटले आहेत. माझ्या शरीरात शक्ती संचारल्याच्या आभास झाला. माझ्या हातातून अग्निलहरी बाहेर पडल्या व त्यामुळे विश्वविहन्त बांधला गेला. माझी शक्ती नियंत्रित करण्यासाठी हिरण्यसर्वेने माझ्या गळ्यात तीच साखळी टाकली.''

''मात्र महीदीप नगरी व तमोमणी नगरी यामध्ये शत्रुत्व का निर्माण झाले?'' नव्येने विचारले.

"सखे! मला तीच शक्ती प्राप्त झाल्यामुळे व निष्कारण मी राजाला बंदी बनवण्यामुळे- नकळत का होईना- विश्वविहन्ताने आपल्याशी शत्रुत्व पुकारलं." वसंतसेना म्हणाली. "त्यामुळेच तुला हवा तो वर निवडता आला नाही म्हणजे तुला ओजवंताशी विवाह करता आला नाही."

"म्हणजे हे होतं माझ्या 'शापित स्वयंवराचं रहस्य'!" ऋत्विका म्हणाली.

# समुद्रदेवाची कृपा आणि मत्स्यागंनेची दुविधा



पारा नामक समुद्राच्या मधोमध एक बेट वसलेलं होतं. त्या समुद्राला 'पारा' असे संबोधले जायचे. कारण पौर्णिमेला समुद्राचा रंग चमचमत्या पाऱ्यासारखा दिसायचा.

त्याच फेसाळत्या- चमचमत्या समुद्रावर मासेमारी करायला अनेक मासेमार पौर्णिमेच्या दिवशी यायचे. मात्र त्यावेळी समुद्र खवळलेला असायचा. त्यामुळे समुद्राची पूजा करू पाहणारे मासेमार समुद्राच्या उसळत्या लोंढ्यात वाहून जायचे. मात्र त्यातील एका मासेमाराच्या प्राणांचे नेहमीच रक्षण व्हायचे.

समुद्रदेवाची कृपा असूनही तो तरुण- ज्याचे नाव मीनाक्ष होते- तो सदैव आपल्या भाग्याला दोष देत राहायचा. तो नेहमीच आपल्या परिस्थितीमध्ये असंतुष्ट असायचा.

असंतोष नेहमीच अवगुण नसतो. असंतोष हा प्रगतीकरिता आवश्यकच असतो. मात्र प्रगती न करताही असंतोष निश्चितच योग्य नव्हे.

तशीच गत मीनाक्षची होती. त्याच्या जाळयात कमी मासे अडकले किंवा त्याच्यात जाळयात मोठा मासा सापडला नाही,तरी तो असंतुष्ट असायचा.

त्या असंतोषाचं फळ त्याला मिळालं, असंच म्हटलं पाहिजे. कित्येक दिवस त्याच्या जाळयात मासे फसले नव्हते म्हणून त्याचा व्यवसाय ठप्प पडला होता. त्याच्या व्यवसाय ठप्प पडल्यामुळे त्याला कोणी उपवर कन्या माळ घालेना. त्यामुळे त्याचे वय वाढत चालले होते. मात्र त्याचा विवाह होईना.

अशा दुर्भाग्यामुळे तो अत्यंत हताश झालेला होता. निराशेतच असताना त्याने दोन मासेमारांचे संभाषण ऐकले.

“अरे, तुला माहित आहे, नीरजसेन? पौर्णिमेला समुद्रात जाळ फेकण्यास मासेमाराचा भाग्योदय होतो.”

“मात्र तेव्हा समुद्र उसळलेला असतो ना?” सुव्रत......”

“पाणी ओसरून झाल्यानंतर मध्यरात्री गेलं, तरच हे शक्य आहे.” हे ऐकून मीनाक्षाने निश्चय केला, तो आजच मध्यरात्री समुद्रात जाळे टाकेल. आणि ठरवल्याप्रमाणे तो पौर्णिमेच्या रात्री समुद्रावर गेला.

मध्यरात्र असल्यामुळे समुद्राची भरती ओसरली होती. समुद्राचे पाणी ओसरलेले पाहून त्याने जाळे टाकले.

काही क्षणांत त्याला जाळे ओढले जात असल्याचे जाणवले. तसे त्याने ते जाळे आपल्या बाजूने खेचले. परंतु त्या जाळ्यातून सुटण्याची त्या जीवाची धडपड चालू होती.

तो आपल्याकडे जाळे खेचत होता आणि तो जीवही वारंवार धडपडत होता, स्वतःला वाचवण्यासाठी.

शेवटी मीनाक्षने आपल्या साथीदारांना बोलावले अन् जाळे ओढायला सुरुवात केली. त्या सर्वांनी वेगाने जाळे ओढले नि तो जीव जाळ्यामध्ये पूर्णपणे गुंडाळून जाऊन किनाऱ्यावर आला.

त्याचे शेपूट माशाप्रमाणे होते व वरचे धड सोनेरी रंगाच्या तंतूंनी झाकले होते. जणूकाही ते सोनेरी धागे त्याच्या वरच्या धडाला गुंडाळले गेले होते.

मीनाक्ष व त्याच्या साथीदारांना वाटले, हा सोनेरी खवल्यांचा आणि सप्तरंगी शेपटीचा दिव्य मासा आहे. हा मासा आपल्या बेटाच्या राजाला विकल्यास सात पिढ्या बसून खाता येईल इतकी संपत्ती आपल्याला मिळेल.

मीनाक्षने आपल्या साथीदारांना सांगितले की तोच ही मासळी आज रात्री घरी नेईल.

त्याची ही मागणी त्याच्या साथीदारांनी मान्य केली कारण मासळी जड होती व ती मासळी उचलणे फक्त बलदंड मीनाक्षलाच शक्य होतं.

मीनाक्षने त्या मासळीला उचलले अन् आपल्या घरी आणले.

इतकी मोठी व सुंदर, दिव्य मासोळी पाहून त्याच्या वृध्द माता-पित्याने विचारले,” बाळा, ही मासोळी तुला कशी मिळाली?”

“आज पौर्णिमेला माझा भागोदय झाला आहे, तेव्हाच हा दिव्य मासा मला प्राप्त झाला आहे.” असं म्हणून मीनाक्ष घाईघाईत स्वयंपाकघरात गेला, तो मोठा मासा घेऊन.

"तो नक्कीच देवमासा असेल." असे त्याला वाटले. त्याने लगेच ते जाळे काढले व तो जीव जाळ्यातून मुक्त झाला.

त्याने त्या जीवाच्या अंगावरचे सोनेरी तंतू बाजूला सारले.

तेव्हा त्याला कळलं की तो मासा नव्हता. ती मत्स्यांगना होती. ते सोनेरी तंतू म्हणजे तिचे केस होते. तिचे वक्षस्थळ मोठ्या शिंपल्यांनी व मोत्यांच्या माळांनी झाकलेले होते. तिचे सपाट पोट आणि फुलांप्रमाणे कोमल असलेली पाठ जखमी झाली होती. कारण जाळे खेचल्यामुळे तिच्या पाठीवर ओरबाड्याच्या खुणा उमटल्या होत्या.

त्या मत्स्यागंनेचा कमरेखालचा संपूर्ण भाग सप्तरंगी खवल्यांचा होता, केसांपासून कमरेपर्यंतचा तिचा शरीराचा भाग मनुष्याप्रमाणेच परंतु नाजुक त्वचेचा होता.

ती जलाविना बेशुद्ध पडली होती, ती तडफडत होती.

मीनाक्षने थोडेसे पाणी त्या मत्स्यागंनेच्या चेहऱ्यावर शिंपडले.

ती शुद्धीवर आली. तिने डोळे उघडले. तसे त्याने तिला पुन्हा पुन्हा न्याहाळून पाहिले. तिचे दैवी सौंदर्य त्याच्या नजरेत मिळालं. ते सौंदर्य आपलंसं करण्याची कामना त्याच्या मनात निर्माण झाली.

ती कामना पूर्ण करण्यासाठी, तिचे मन जिंकण्याच्या हेतूने त्याने पाण्याच्या एका मोठ्या घंघाळयात तिला उचलून ठेवले. त्यामुळे त्या मत्स्यागंनेला काहीसे बरे वाटले.

तिला बरे वाटलेले पाहून मीनाक्षने तिच्या जखमांवर हळदीचा लेप लावण्यास सुरुवात केली. त्यामुळे तिला अधिकच बरे वाटू लागले.

“धन्यवाद. आपण माझा जीव वाचवलात म्हणून.” ती मत्स्यांगना म्हणाली.

“जीव वाचवलात म्हणजे?” त्याचा प्रश्न.

“मी फक्त दिवसाचे दोन प्रहर पाण्याशिवाय राहू शकते. मात्र रात्री मला पाण्याशिवाय जगताच येत नाही.” मत्स्यागंनेने म्हटले.

“तू कोण आहेस?” मीनाक्षने विचारले.

“मी मत्स्यागंना आहे, माझे नाव संश्लेषा आहे.” संश्लेषेने म्हटले.

“संश्लेषे! तुझा जीव वाचवणे व तुझ्या जखमांवर उपचार करणे हे तर माझे परमकर्तव्य आहे.” मीनाक्ष फसव्या गोड शब्दांत म्हणाला.

“आपले फार उपकार झालेत, मी काय करू तुमच्यासाठी?” संश्लेषेने आपल्या मंजुळ स्वरात म्हटले.

"तर विवाह कर माझ्याशी?" त्याची अनपेक्षित मागणी ऐकून संश्लेषा हादरली. क्षणार्धात मनुष्यरुप धारण करून ती धावतच समुद्रापाशी गेली. तिचे तसे निघून जाणे त्याला निराशादायी ठरलं होतं.

परंतु संश्लेषेकडे अन्य पर्याय नव्हताच. तिने समुद्रदेवाचे आवाहन केले, "समुद्रदेव! हे काय विपरीत घडले आहे? एक कामुक तरुण मासेमार मला विवाहाकरिता गळ घालीत आहे."

तिच्या आवाहनानंतर समुद्रदेव प्रकटला. त्याने कठोर स्वरात तिला सूचित केले, "संश्लेषा! तो मीनाक्ष तरुण- त्याला तू 'कामुक' म्हणू नकोस. तो माझा कृपापात्र भक्त आहे. त्याची जी इच्छा आहे, ती इच्छा पूर्ण कर. अन्यथा तू माझ्या रोषास कारणीभूत ठरशील."

"परंतु……" भेदरलेली संश्लेषा काही प्रश्न विचारण्यापूर्वीच समुद्रदेव लुप्त झाला.

तितक्यात मीनाक्ष तिच्या पाठीपाठी आला.

"माझ्याशी विवाह करशील?" त्याची पुन्हा तीच मागणी.

"मी जलकन्या आहे. पाणी हेच माझे जीवन आहे. मी पाण्याशिवाय जगू शकत नाही. तुम्ही माझी ही समस्या सोडवाल?"

“हो, मी रोज रात्री तुझ्यासाठी एक पाण्याचा मोठा घंघाळ भरुन ठेवेन. जेणेकरून तू त्यात मनसोक्त डुंबत राहशील.” त्याने असं म्हणून तिचा हात धरला, “तर मग तू प्रसन्न आहेस ना?”

“मी तुमच्याशी विवाह करेन.” संश्लेषेने आपली इच्छा नसतानाही विवशतेने होकार दिला.

“तर विवाह कधी करायचा? दोन-तीन दिवसांत?” असं म्हणत मीनाक्षने विचार करत म्हटले, “नाही,सुंदरी,हा विवाह उद्याच झाला पाहिजे.”

ह्या युवकाची कामना इतकी प्रबळ आहे, की तो एक-दोन दिवस धीरही धरू शकत नाही, संश्लेषेच्या मनात आलं.

“उदया?” संश्लेषेने प्रश्न केला.

“कारण तू मत्स्यांगना- जिला माझे मित्र ‘ दिव्य मासोळी' समजत होते, ती मासोळी आम्ही सर्वांनी राजाला विकण्याची योजना केली होती. त्या मित्रांना हे कळता कामा नये की, तू कोणतीही दिव्य मासोळी नसून एक जलकन्या आहेस.” मीनाक्षने म्हटले.

असं कारण आहे तर! संश्लेषेने सुस्कारा टाकला.

“आता मी समुद्राचा आश्रय असे घेऊ का, की तुमच्या घरी येऊ?” संश्लेषेने विचारले.

“ तू आज रात्री समुद्रातच विश्रांती घे आणि मी सांगितलं, तसंच तू उद्या केलं पाहिजेस. तू जर माझ्या योजनेचे पालन केलेस, तर माझ्या मित्रांना तूच जलकन्या असण्याचा संशय घेणार नाही.” असं म्हणून तो संश्लेषेच्या कानांत कुजबुजला.

त्याची सर्व योजना ऐकून ती विचारांत पडली. ही योजना का व कशासाठी? फक्त तिला प्राप्त करण्यासाठी? ही योजना यशस्वी होईल का? अशी शंका तिला आली.

मात्र संश्लेषेचा नाइलाज झाला, “मी नक्कीच आपल्या योजनेला तडीस नेईन.”

असं म्हणून संश्लेषेने मत्स्यागंनेचे रूप धारण करून समुद्रात उडी मारली व मीनाक्षही घरी परतला.

स्वयंपाकघराच्या उंबऱ्यावर पडल्यापडल्या तो विचार करीत होता, जर त्याच्या मित्रांना ती मासळी एक मत्स्यनारी असल्याचे कळले, तरी ते सर्वजण आपल्या बेटाच्या राजाला ती मत्स्यांगना विकून अमाप संपत्ती मिळवतील. आणि आपल्यालाही ही जलसुंदरी मिळणार नाही!

अशा विचार करता- करता कधी पहाट झाली,ते कळलंच नाही.

मीनाक्ष नेहमीप्रमाणे लवकर उठून त्याचे जाळे घेऊन समुद्रावर गेला. त्याचे इतर साथीदारही डोलकाठी,  जाळी, नावा वगैरे मासेमारीची तयारी करत होते.

ते पाहून मीनाक्षनेदेखील उगीचच आपलं जाळं साफसूफ करण्याचा अभिनय करायला सुरुवात केली. तसे त्याचे मित्र-सुव्रत, नीरजसेन इत्यादी त्याच्याकडे जवळ आले.

“मासोळी कुठे आहे? तो दिव्य मासा राजाला विकायचा होता ना?” सुव्रताने विचारले.

“माझं नशीबच फुटकं आहे. मी त्याला ‘सुवर्ण' समजून बसलो, ते तर कथिल होतं.” असं म्हणून तो खोटे अश्रू ढाळू लागला.

“म्हणजे?” नीरजसेनने विचारले.

“तुम्हीच स्वतः घरी येऊन पहा ना......” असं म्हणून मीनाक्ष त्यांना आपल्या घरी घेऊन गेला.

“हे पहा........” त्याने स्वयंपाकघरात बोटाने निर्देश करत ‘ते ‘ दाखविले.

“अरे देवा....” त्याच्या सर्व मित्रांनी कपाळाला हात मारला. कारण त्यांनी सप्तरंगी खवले व सोनेरी तंतू ज्याला समजले होते, ते तर तुटक्या-

फुटक्या नावेच्या अवशेषावर गुंडाळलेली सप्तरंगी वस्त्रे आणि काळपट पडलेल्या सोन्याच्या साखळ्या होत्या.

"या मीनाक्षाच्या पदरी कधी फुटकी कवडीही पडली आहे का? तर दिव्य मासा कसा पडणार?" नीरजसेनाने नाक मुरडले.

"चला रे परत. या मीनाक्षच्या दुर्दैवावर शोक करण्यापेक्षा आपण मासेमारी करुया" असं म्हणून त्याचे मित्र निघून गेले.

मीनाक्षने मनोमन संश्लेषेचे आभार मानले, "तू बरे केलेस, ते समुद्रतळाशी असलेले नावेचे जुने अवशेष आणून दिलेस."

आपल्या भावनावेगातून सावरीत तोही समुद्रकिनारी गेला. त्याने पाहिले की त्याचे मित्र समुद्रात जाळे टाकण्याच्या तयारीत आहेत.

तितक्यात सर्वांना ''वाचवा, वाचवा, मी समुद्रात बुडते आहे." असा आवाज आला. तसे सर्वांनी पाहिले, एक स्त्री समुद्राच्या पाण्यात बुडत होती.

तिला वाचविण्यासाठी मीनाक्षाने पाण्यात उडी घेतली. त्याने तिचे लांबसडक केस व तिचे नाजूक हात धरून तिला बाहेर काढले.

त्याच्या सर्व मित्रांनी त्या सुंदर स्त्रीकडे पाहिले. तिचे काळेभोर केस तसेच काळेशार डोळे, गुलाबी जिवणी व नाजूक बांधा- तिचे सौंदर्य सर्वांना

न्याहाळतच राहावंसं वाटलं. त्यातही तिच्या अंगावरचे ओलेते नि तिच्या केसांतून पाण्याचे टपटप गळणारे थेंब तिचे लावण्य अधिकच खुलवत होते.

त्या स्त्रीने मीनाक्षच्या चरणांवर स्वतःला झोकून दिले, "आपण माझे प्राण वाचवल्याबद्दल धन्यवाद. तुम्ही जर माझे प्राणरक्षण केले नसते तर….."असं म्हणून ती स्त्री रडू लागली.

"कोण आहेस तू?" सुव्रताचा प्रश्न.

"मी एक दुर्दैवी कन्या आहे, जिला कोणी परपुरुषाने समुद्रात ढकलून दिले आहे. मी त्याची कामना पूर्ण करू शकले नाही म्हणून……" असं म्हणून त्या स्त्रीने मीनाक्षचे चरण धरले, "मी संश्लेषा, माझे प्राण या देवदूतानेच रक्षिले….."

"अगं, संश्लेषे! माझे चरण धरुन मला लाजवू नकोस. मी तर फक्त आपले कर्तव्य केले आहे." मीनाक्षने म्हटले.

"मी निराश्रित स्त्री आहे, आपणच मला आश्रय द्यावा." संश्लेषेने म्हटले.

"म्हणजे?" नीरजसेनाने विचारले.

"म्हणजे या देवदूताने माझ्याशी विवाह करावा, इतकीच माझी याचना आहे." संश्लेषा नम्रतेने म्हणाली.

“अगं, काहीही काय? मी आणि तुझ्यासारख्या स्वरूपसुंदरीशी विवाह? हे कसं शक्य आहे?” मीनाक्ष म्हणाला.

“तर माझ्याशी विवाह कर.” सुव्रताने म्हटले. त्याचे शब्द ऐकून मीनाक्षला धक्का बसला. त्याला वाटले, हा सुव्रत आपल्या संश्लेषेला आपल्यापासून हिरावून तर घेणार नाही ना?

“नाही, मी याच देवदूताशी विवाह करेन, अन्यथा मी आत्मघात करेन.” तिने अनपेक्षितरीतीने मात्र मीनाक्षची आशा पल्लवित करत गर्भितपणे धमकावले.

“हे देवी, जर तू हे भयंकर पाऊल उचलणार असशील, तर मी तुझ्या जीवनरक्षणासाठी तुझ्याशी विवाह करेन.” मीनाक्षच्या शब्दांत ठाम निश्चय होता.

“कृपया मला आपल्या घरी घेऊन जावे, नाथ.” संश्लेषेने विनंती केली.

मीनाक्षने संश्लेषेच्या खांद्याभोवती आपले वस्त्र लपेटले व तो तिला आधार देत चालू लागला.

ते पाहून त्याचे अन्य मित्र मत्सराने जळू लागले.

“कोणतीही दिव्य मासोळी मीनाक्षला मिळाली नाही, म्हणून काय झालं? ही सुंदर तरुण मासोळी त्याच्या जाळ्यात फसली ना.” नीरजसेन जाळे गुंडाळीत होता.

“त्याचे भाग्य आपल्या सर्वांपेक्षा अधिक चांगलं आहे.” सुव्रताने डोलकाठी व्यवस्थित लावत म्हटले.

“नाहीतर आपल्या सर्वांच्या भार्यांपेक्षा अत्याधिक रूपवती असणारी स्त्री त्याला अनायासे प्राप्त झाली, त्याची योग्यता नसूनही.”

“समुद्रदेवाने निश्चितच हा प्रसाद धाडला असणार.” नीरजसेनाने म्हटले, “नाहीतर खापरखुंटीमध्ये आपोआप रत्न पडत नसते.”

“हं,” जो तो मासेमार आपल्या कामाला लागला.

यथावकाश मीनाक्ष संश्लेषेसह आपल्या घरी पोहोचलादेखील. त्याने पाहिले, त्याचे माता-पिता त्याचीच प्रतीक्षा करत होते.

“बाळा, कधीकधी मासेमारांच्या जाळ्यात मासळीऐवजी निराशा पदरी पडते, म्हणून तू दुःखी होऊ नकोस.” त्याच्या पित्याने- मणिमानने म्हटले.

“म्हणजे?” मीनाक्षने विचारले.

“मीनाक्ष! आम्हाला कळलं आहे की तुझ्या जाळ्यात तुटक्या-फुटक्या नावेचे अवशेष सापडले आहेत.” त्याच्या मातेचे- आद्रिकेचे शब्द ऐकून मीनाक्षच्या जीवात जीव आला.

“ही कोण आहे, पुत्रा?” मणिमानने विचारले.

“मी निराश्रित अन् अनाथ कन्या आहे. मला एका परपुरुषाने समुद्रात लोटून दिले असतां, या देवदूतानेच माझे रक्षण केले आहे. म्हणून मी या युवकाला वरणार आहे.” संश्लेषा म्हणाली.

“काय?” मणिमान- आद्रिकेला विस्मयाचा सुखद धक्का बसला.

“अन्यथा ही स्त्री आत्मघात करू शकते.” मीनाक्षने त्या दोघांना भावनाविवश करण्याच्या हेतूने म्हटले.

“अरे, पुत्रा! या सुंदर स्त्रीरत्नाला नाकारण्याचे काहीच कारण नाही. आमची या विवाहाला अनुमती आहे.” मणिमान म्हणाला.

“बाळा, समुद्रदेवाने आमच्या वंशासाठी वधू आणि गृहलक्ष्मी पाठवली आहे. तिचा सहर्ष स्वीकार केला पाहिजे.” आद्रिकेने म्हटले.

त्या दोघांची संमती मिळाल्याकारणे मीनाक्षचा आनंद गगनात मावेनासा झाला.

“कधी करायचा आहे विवाह?” मीनाक्षला आता राहावेना.

“दोन दिवसांत.” आद्रिकेच्या शब्दांनी मीनाक्ष सुखावला.

……. आणि विवाहाची तयारी सुरू झाली.

मीनाक्षच्या घराला नवे रूप लाभले होते. प्रत्येक खिडकीवर व दारावर पाना- फुलांच्या माळा बांधल्या गेल्या. अंगणात विवाहवेदी रचली गेली आणि लहानसे होमकुंडही, सोबतीला चार खांबही.

अजून एक महत्त्वपूर्ण कार्य चालू होतं. आद्रिका नववधू संश्लेषेला सजवत होती, फुलांनी व संश्लेषेच्याच अलंकारांनी. अन् नववधुकरिता असलेली श्वेत- लाल रंगाची मंगलवस्त्रे आद्रिकेने आपल्या सुनेला दिली.

संश्लेषेने ती वस्त्रे हातात घेतली. ती वस्त्रे किती जड होती! त्यावर जडवलेले छोटे-छोटे शिंपले आणि खडे अंगाला टोचू पाहत होते.

तिला अशी जड वस्त्रे परिधान करण्याची सवय नव्हती. त्यात तिची कोमल त्वचा- त्या त्वचेला खडे टोचले तर......

ती विवंचनेत होती. परंतु समुद्रदेवाच्या आज्ञेप्रमाणे तिला हे सर्व करावंच लागणार होतं.

ती जशी सामान्य रीतीने वस्त्राच्या निऱ्या तिच्या दुसऱ्या वस्त्राला खोचल्या, तसे आद्रिकेने म्हटले, “नाभीच्या खाली निऱ्या खोचू नकोस, कमरेच्या उजवीकडे वस्त्राच्या निऱ्या खोचून घे आणि पदर काढण्यापूर्वी कमरेभोवती एकदा वस्त्र आडवे गुंडाळून घे.”

वस्त्र परिधान करण्याची ही वेगळी, विचित्र पद्धती ऐकून संश्लेषा संभ्रमित झाली. मात्र आद्रिकेने तिला पुनः पुनः समजावून तिचा संभ्रम दूर केला.

मणिमानच्या घराण्याच्या परंपरेनुसार संश्लेषेने ते विवाहाचे वस्त्र परिधान केले नि ती विवाहवेदीवर पोहोचली.

अन् नवरदेव असलेला मीनाक्षही श्वेतशुभ्र व नीळसर वस्त्रे परिधान करून मस्तकावर, कमरेवर पुष्पमाला धारण करून विवाहवेदीवर आला.

सर्वप्रथम संश्लेषेने परंपरेनुसार फुलांच्या पाकळ्या सांडवत मीनाक्षच्या समोर गेली.

मीनाक्षी व संश्लेषेच्या मधोमध पाना-फुलांच्या माला होत्या. त्यामुळे ते दोघे एकमेकांना पाहू शकत नव्हते.

त्यानंतर विशिष्ट शब्दांचा उच्चार झाला आणि त्या दोघांनी एकमेकांना वरमाला घातल्या. त्या दोघांवर मीनाक्षच्या मित्रांनी फुलांचा वर्षाव केला.

वरमालेच्या विधीनंतर मीनाक्षी नि संश्लेषेने समुद्रदेवाला व अन्य इष्टदेवतांना आहुती दिली.

आहुती दिल्यानंतर मीनाक्षने त्या बेटाच्या परंपरेनुसार संश्लेषेच्या कपाळावर शिंपल्याने कुंकू रेखले. तेव्हा संश्लेषेच्या मनात आले, हे कुंकू खरं पाहता एखाद्या जलमानवाचं असायला हवं होतं ना? पृथ्वीतलावरील मनुष्याशी आपला विवाह लावून देण्यात समुद्रदेवाचे काय प्रयोजन आहे?

तितक्यात मणिमानचा आवाज तिच्या कानी पडला, "शंखातील पवित्र जल आपल्या पतीच्या मस्तकाला लाव, जेणेकरून समुद्रदेवाची कृपा त्याच्यावर कायम राहील."

ती लगेच भानावर आली. तिने मीनाक्षच्या मस्तकाला ते पवित्र जल लावलं.

त्यानंतर शेवटचा विधी महत्त्वाचा- सौभाग्याची चिन्हे पत्नीला धारण करणे.

सौभाग्याचे चिन्ह म्हणून शिंपल्यांची माळ त्याने तिच्या कंठात बांधली आणि तिच्या हातांत शंखांची कंकणे सरकवली.

कंकणबंधनानंतर आद्रिकेने त्याचा हात तिच्या हाती दिला अन् घराकडे हस्तनिर्देश केला.

आता गृहप्रवेशाचा समय होता. मीनाक्ष संश्लेषाचा हात धरून घराच्या दाराशी आला, तेव्हा नीरजसेनाच्या पत्नीने- संशिकेने दाराच्या उंबऱ्यात मोठे जलपात्र ठेवले. त्या जलपात्रात आपले चरण घालून संश्लेषेने आपल्या ओल्या पावलांनी घरात प्रवेश केला. तिच्या मागोमाग तिचा पतीही आला.

संशिकेने त्या दोघांचे स्वागत केले. आद्रिका व मणिमानने मीनाक्ष-संश्लेषेला आशिर्वाद दिला.

आपला विवाह संपन्न झाल्यामुळे मीनाक्ष अत्याधिक प्रसन्न झाला. संश्लेषा अजूनही द्विधेतच होती.

तिने विभिन्न स्वप्ने पाहिली होती, समुद्रपुत्राशी विवाह करण्याचे अथवा नागकुमारासह गृहस्थीही करण्याचे, नाहीतर जलमानवासमवेत मणिबंधन करण्याचे, अशी स्वप्ने.

त्या पौर्णिमेच्या रात्री मीनाक्षचा भाग्योदय झाला होता नि संश्लेषेची स्वप्ने भंगली होती.

आजही तिला स्पष्टपणे आठवत होता तो क्षण, ज्याक्षणी कुणा एका मासेमाराने फेकलेल्या जाळ्यात ती फसली होती.

परंतु पौर्णिमेला समुद्राबाहेर येऊन समुद्राच्या लाटांमध्ये समुद्रदेवाकरिता गायन करण्यात तिचा काय दोष होता? मत्स्यांगनांना किंवा जलकन्यांना फक्त पौर्णिमेलाच समुद्राबाहेर येण्याची अनुमती असते. कारण बव्हंशी मासेमार पौर्णिमेच्या वेळी भरती आलेल्या समुद्रात जाळे फेकत नसत.

तिने सारंगी वाद्य आपल्या हातात घेतले, ती समुद्रदेवाला प्रसन्न करण्यासाठी त्या वाद्यांच्या तारा छेडणारच होती.... तितक्यात तिच्या नाजूक अंगावर ते कठोर- कडक जाळे पडले. ती सारंगी तिच्या हातातून निसटली.

संश्लेषेने आपल्या नखांनी जाळे तोडण्याचा प्रयत्न करायला सुरुवात केली. त्यामुळे जाळे समुद्रात वारंवार ओढले जाऊ लागले.

तिच्या या प्रयत्नांमुळे मीनाक्षला वाटलं, कोणता तरी मासा जाळ्यात अडकला आहे.

लगेचच बाहेरुन जाळे जोरात ओढले गेले आणि त्याबरोबर संश्लेषाही. जाळ्याच्या कठोरतेमुळे ती कोमल स्त्री जखमी झाली, अन् किनाऱ्यावर आल्यानंतर तिचा श्वास घुसमटू लागला, पाण्याविना ती बेशुद्ध पडली.

त्यानंतर मीनाक्षची अनपेक्षित मात्र धक्कादायक मागणी, समुद्रदेवाचा रोष आणि त्या रोषाच्या भयाखातर केलेला हा विवाह- सर्व सर्वकाही पुन्हा आठवले संश्लेषेला.

हे सर्व घटना प्रसंग ओवलेल्या मण्यांप्रमाणे एकामागोमाग अतिवेगाने घडत गेले की, संश्लेषेला क्षणाचीही उसंत मिळाली नाही.

अशाच विमनस्क स्थितीत असताना तिचा हात खेचला गेला, मीनाक्ष तिचा हात धरून पुढे चालला होता. तिला कळले नाही, घराच्याही आत मीनाक्ष तिला कुठे नेत आहे ते.

मीनाक्षने तिला सर्वप्रथम शयनकक्षात नेले. आजूबाजूला कोणी नाही, हे पाहून त्याने तिला घट्ट आलिंगन दिले. त्याच्या बलदंड बाहूंचा विळखा तिला जरा विचित्रच वाटला.

मीनाक्षने तिला बाहुपाशात घेऊन तिच्या कानांत म्हटले ,” प्रियतमे! तुला वाटलं असेल,की माझ्या एखाद्या मित्राच्या जाळ्यात अडकली

होतीस. नाही, ते जाळे माझेच होते. मीच भाग्योदयाच्या आशेपायी ते जाळं पौर्णिमेच्या रात्री समुद्रात फेकलं होतं. त्यात तू अडकलीस आणि घायाळ हरिणीसारखी माझ्याकडे आलीस.”

संश्लेषेला धक्काच बसला. तिला मीनाक्षच्या कामुकतेवर रोष असला तरी, त्या दिवशी त्याने केलेल्या साहाय्याने तिला उपकृत वाटलं होतं. म्हणून तिला वाटलं होतं, मीनाक्ष हे जाळे समुद्रात फेकून तिला असा ओढणार नाही.

तिला आठवले, जेव्हा जाळे जोरात खेचले गेले, तेव्हा ती खेचली, फरफटली गेली. त्यामुळेच तिची त्वचा आहत झाली होती.

या मीनाक्षच्या बलदंड बाहूंचा विळखा किती मजबूत आहे! निश्चितच मीनाक्षनेच इतक्या जोरात ते जाळे ओढलं असणार! संश्लेषेने विचार केला.

मात्र ती क्षणात हताश झाली. परंतु आता हे सर्व जाणून काय उपयोग? तिचा व त्याचा विवाह होऊन गेला आहे. समुद्रदेवाने त्या दोघांची विवाहगाठ बांधून दिली होती. त्यामुळे सर्व काही स्वीकारल्याशिवाय काहीच पर्याय नाही.

“तुम्ही जे केलंत, ते अजाणतेपायी केलंत, नाथ.” संश्लेषेने म्हटले.

“याचा अर्थ, तुला याबद्दल काहीच आपत्ती नाही.” मीनाक्षच्या शब्दांवर संश्लेषेने मान डोलावली.

"अरे हे काय?" अकस्मात आद्रिका तेथे आली. ते दोघे एकमेकांपासून दूर झाले, "अरे पुत्रा! तुला काय इतकाही धीर नाही का?"

ती ऐकून मीनाक्ष लाजला. संश्लेषा मात्र शांतपणे उभी होती.

"अरे, विवाहानंतर प्रतिपदेची पूजा झाल्याशिवाय पती-पत्नीने एकमेकांना स्पर्शही करू नये इतकेही लक्षात आलं नाही तुझ्या, पुत्रा?" आद्रिकेने म्हटले, "चल, संश्लेषे! तू माझ्यासह ये."

असे म्हणून आद्रिकेने संश्लेषेला आपल्यासह स्वयंपाकघरात नेले.

हे ऐकून मीनाक्ष स्वतःवरच रागवला. अजून पाच- सहा दिवस प्रतीक्षा करावी लागणार, याला काय म्हणावे? समोर पक्वान्ने असूनही भुकेले राहणे, दुसरे काय?

तो रागाने समुद्रकिनारी मासे पकडण्याच्या निमित्ताने गेला व तिथेच बसून राहिला. तो आपल्याच तंद्रीत होता. काही क्षणांतच अंधार पडला. त्याला कळले, चंद्रोदय झाला आहे.

तसा तो उठला आणि घरी गेला. त्याने तेथे पाहिले, मणिमान, आद्रिका, संश्लेषा भोजनाकरीता एकत्रित बसले होते.

"ये पुत्रा! तूही भोजन कर, आमच्यासमवेत." त्याच्या मातेने त्याच्या पत्रावळीत भोजन वाढले.

त्याने चार- दोन घास निरीच्छेने पोटात ढकलले, आणि शयनकक्षात जाऊन काष्ठाच्या मंचकावर अंग टाकले.

आद्रिकेने आपल्या जवळच संश्लेषेकरिता झोपण्यासाठी वृक्षाची साल- त्यावर मऊ वस्त्र अंथरले व ती स्वतःदेखील पहुडली.

मणिमान पडल्या- पडल्या घोरु लागला. त्या दोघांना झोपलेले पाहून थोड्यावेळाने संश्लेषा उठली, ती दबक्या पावलाने घराच्या मागच्या दारातून बाहेर आली व समुद्राच्या दिशेने धावली.

तिला समुद्रदेवाला एक प्रश्न विचारायचा होता. म्हणून तिने समुद्रकिनाऱ्याची वाळू, शंख-शिंपले समुद्राच्या पाण्यात अर्पण केले, हात जोडून समुद्रदेवाचे आवाहन केले.

तिच्या आवाहनानंतर समुद्रदेव काही वेळाने प्रकटला, "काय झालं, संश्लेषा? तू अजूनही असंतुष्ट आहेस?"

"नाही, समुद्रदेव! एक प्रश्न विचारायचा होता. त्याचं काय आहे ना, पत्नीला पतीविषयी सर्वकाही जाणून घेण्याचा अधिकार असतो म्हणून......."

"बोल, संश्लेषे! तुला आपल्या पतीविषयी काय जाणून घ्यायचे आहे?"

“माझा पती कृपापात्र आहे, याचे कारण काय?” संश्लेषेने भीतभीतच पृच्छिले. तिला वाटलं, पुन्हा समुद्रदेव रुष्ट झाले तर.......

“तुला हे सर्व जाणून दुःख होईल. तुम्ही सर्व जाणून न घेणे श्रेयस्कर.” समुद्रदेवाने म्हटले.

“मला कितीही दुःख झाले, तरी मी हे रहस्य जाणून घेणारच. कारण माझी स्वप्ने केव्हाच भंगली आहेत. त्यामुळे मला कशाची चिंता नाही.” संश्लेषेने निर्धार केला.

“ठीक आहे, मी तुला मीनाक्षच्या पूर्वजन्माविषयी सांगतो. मीनाक्ष पूर्वजन्मीही एक मासेमार होता, जो सदैव माझी भक्ती करायचा,माझी आराधना करायचा. दर पौर्णिमेला न चुकता तो माझी पूजा करायचा, आहुती द्यायचा, स्वतःच्या जीवाला धोक्यात घालून. त्यामुळे मीही त्याला आपल्या लाटांत ओढत नसे, त्याचे प्राणरक्षण मी करत असे. मात्र एका पौर्णिमेला तो भरतीच्या लाटांमध्ये उभा होता, पूजा करण्याच्या वेळी. त्यामुळे तो वाहून गेला. मी आपल्या विशाल लाटेने त्याला सांभाळण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याला एका मत्स्यांगनेने वाचवले आणि समुद्रतळाशी आपल्या महालात नेले. तिने नकळत ते कृत्य केले की त्या कृत्यात तिचा दुष्ट हेतू होता, हे तर मी जाणत नाही. मात्र तिच्या या कृत्यामुळे माझ्या भक्ताचा पाण्यात श्वास कोंडू लागला, अन् काही वेळाने त्याचा मृत्यू झाला.

त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या आत्म्याने मला विनंती केली, “मला असा वर द्यावा की माझा पुनर्जन्म एका मासेमाराच्या रूपातच व्हावा, नि माझा विवाह एका जलकन्येशी व्हावा, जेणेकरून तिलाही कळावे की पाण्याशिवाय तिचे जीवन किती दुष्कर असणार आहे.” मी त्याला तसे वरदान दिले. त्यामुळे त्याचा- तुझा विवाह झाला.” समुद्रदेवाने म्हटले.


“मात्र या सगळ्यांत माझा काय दोष, समुद्रदेव?”

“त्यात तुझा दोष नाही. किंतु मीनाक्षने तुलाच विवाहाची मागणी घातली, म्हणून मी तुला विवाह करण्याची आज्ञा दिली. किंबहुना मला ती आज्ञा द्यावी लागली.” समुद्रदेवाचे शब्द ऐकून संश्लेषा स्वतःच्या दुर्भाग्यावर क्रुद्ध झाली. म्हणजे कर्म दुसऱ्या जलकन्येचे, फळ मात्र भोवले संश्लेषेला!

समुद्रदेवाच्या वरदानाचा दुसरा अर्थ असा होता, जो संश्लेषेला समजला- जलात राहणाऱ्या व मुक्तपणे विहार करणाऱ्या मस्त्यांगनेला पाण्याच्या एका घंघाळ्यात बंदिस्त राहावे लागणार होते, तेही आयुष्यभरासाठी.

एका मत्स्यांगनेकरिता हीच मोठी दुविधा होती….!

# शापित मायावी महाल



पाच हजार वर्षांपूर्वी- किंबहुना त्याहीपूर्वी एक सुंदर अद्भुत आणि विलक्षण सभाभवन होते, जे इंद्रप्रस्थात होते नि जो प्रसाद पांडवांना मयासुराने बांधून दिला होता. त्याच प्रासादात पांडवांचा तसेच द्रौपदीचा

राज्याभिषेक झाला होता व त्याच भवनात दुर्योधन आभासी जलकुंडात भिजला होता आणि त्याच्यावर पांडव हसले होते, त्यानंतर द्रौपदी वस्त्रहरणापासून भारतीयुध्दाकडे सुरू झालेली वेगवान वाटचाल सर्वांनाच ठाऊक असेलच.

मयूरशिखा नगरीचा राजा असलेल्या- मयंककेतुच्या मनातही हीच कथा घोळत होती. कवि दिव्येंदुच्या शब्दांकडे त्याचे लक्षच नव्हते.

*“ऐशा तऱ्हेने स्वतःच नकळत*

*केलेल्या हास्य- उपहासाकारणे पांडव*

*जाहले पतित काळाच्या असीम कुंडात,*

*नव्हे नव्हे, तीच मायावी मयसभा*

*होती अभिशप्त||”*

काव्याचे हे चरण न ऐकताच मयंककेतुने म्हटले,

” मित्रा, दिव्येंदु! तुला काय वाटतं,माझ्याकडेही मयसभेसारखे सभाभवन असायला हवे.”

“म्हणजे, हे राजा! तू माझ्या काव्याचे चरण ऐकले नाहीस?” दिव्येंदुने विचारले.

“काय म्हणाला होतास तू शेवटच्या चरणांत?” मयंककेतुचा प्रश्न.

“तीच मायावी मयसभा होती अभिशप्त!” दिव्येंदुने त्या चरणांचा पुनरोच्चार केला.

“असं काहीही नव्हतं. पांडवासोबत व पांचालीसोबत जे काही घडले, तो पांडवांच्या धर्मकार्पण्याचा व कौरवांच्या कपटाचा परिणाम होता. त्यात मयसभेच्या मायेचा काहीच संबंध नव्हता" मयंककेतुने तर्क केला.

“संबंध कसा नव्हता? मयासुराचे बांधव- कुटुंबीय अर्जुनाने प्रज्वलित केलेल्या अग्नित जळून गेले. त्यामुळे मयासुराच्या मनात पांडवाबाबत क्रोध,असूया, तीव्र रोष, उद्वेग व अभिशप्ततेची भावना असणे स्वाभाविक आहे.” दिव्येंदुने स्पष्टीकरण दिले, “आणि हे राजा! तुला माहितच असेल की वास्तू घडविताना स्थापत्यकाराच्या मनातील भावना त्या वास्तूमध्ये आपोआपच संक्रमित होतात.”

“त्याचा येथे काय संबंध, दिव्येंदु मित्रा?”

“मयासुराच्या या भावना त्या सभाभवनात संप्रेषित झाल्या असतील अन् दुर्योधन त्या भवनात गेल्यावर त्याच्या क्रोध,मत्सरादि पूर्वभावनांना मयासुराच्या सुप्त विचारांची पुष्टीच मिळाली असावी.”

“ यात पांडवांचा काहीच दोष नव्हता? भीमसेनाने धृतराष्ट्राच्या अंधत्वाचा उल्लेख करून दुर्योधनाचा उपहास करायला नको हवा होता, मित्रा दिव्येंदु?”

“ हे जरी सत्य असले, तरीही कौरवांनी पांडवांना बालपणीपासून त्रस्त केले होते. त्यामुळेच भीमाचा रोष अशा रीतीने बाहेर पडला ना?”

अशा रीतीने दिव्येंदु आणि मयंककेतुने वाद- प्रतिवाद करण्यास सुरुवात केली.

तितक्यात-

“ आर्यपुत्र आणि कविराज! आपण का वाद-विवाद करत आहात?”

“ कविराजांनी नक्कीच अवघड प्रश्न केला असेल, हो ना, आर्यपुत्र?”

“ अरे, मरुषिका आणि मधुरिमा ! तुम्ही दोघी?” मयंककेतु चकित झाला.

मरुषिका आणि मधुरिमा- मयंककेतुच्या दोन्ही प्रिय राण्या- त्या दोघीही राजस्त्रिया मयंककेतु व दिव्येंदुकरिता राजभोग नामक दुग्धजन्य पदार्थ घेऊन आल्या.

“ हा घ्या राजभोग, आर्यपुत्र?” मरुषिका म्हणाली.

“ आपणही घ्यावे, कविराज!” मधुरिमेने राजभोगाचे सुवर्णपात्र दिव्येंदुला देत म्हटले.

“ अरे माझ्या दोन्ही प्रजावतीहो! तुम्हाला हा राजभोग तयार करायची काय आवश्यकता होती?” दिव्येंदुने पात्र घेत म्हटले.

“ राजभोग अत्यंत स्वादिष्ट झाला आहे. निश्चितच मधुरिमेनेच हा पदार्थ तयार केला असणार!” मयंककेतुने राजभोग ग्रहण करत म्हटले.

“ हा राजभोग मधुरिमेनेच बनवला आहे. परंतु मी त्यावर आपले प्रिय केशर शिडकले आहे.” मरुषिकेने हसत म्हटले.

“प्रजावती मरुषिके! तू किती विनोदी स्वभावाची आहेस!” दिव्येंदु म्हणाला.

“मित्रा! ती तशीच आहे विवाहापासून!” मयंककेतुने म्हटले, हसतच.

“आणि ही मधुरिमा आजही तशीच मधुर आहे.” मरुषिकेने मधुरिमेच्या खांद्यावर हात ठेवत म्हटले.

“आर्या काहीही म्हणते, आर्यपुत्र!” मधुरिमेने लाजत म्हटले.

“मला काहीतरी सांगायचे आहे, प्रजावतीहो!” दिव्येंदुने त्या दोन्ही राण्यांना विचारले, “ तुम्हां दोघींनाही राजनचे म्हणणे पटते की नाही, ते तुम्ही मला सांगा.”

“आर्यपुत्रांची नेमकी कोणती बाब तुम्हांला खटकली, कविराज?” मरुषिकेचा प्रश्न.

“प्रजावती मरुषिके! तुम्हा दोघींच्या पतीला पांडवांच्या मयसभेसारखी सुंदर, मायावी, अद्भुत आणि विलक्षण असा महाल अथवा सभाभवन निर्माण करण्याची इच्छा आहे.” दिव्येंदुचे शब्द ऐकून त्या दोघींनाही तीव्र धक्का बसला. त्या दोघी राजस्त्रिया एकही शब्द न बोलतां, तिथून निघून गेल्या. इतकंच नव्हे तर जाताना त्या दोघी मयंककेतुला उद्देशून, “आज्ञा असावी!” असं नेहमीप्रमाणे बोलणंही विसरून गेल्या.

त्या दोघींचे अकस्मात निघून जाणे मयंककेतुला पेचात टाकणारे होते. त्याला कळेनाच, त्याच्या या इच्छेला दिव्येंदुने स्पष्टपणे विरोध दर्शवला, मात्र त्याच्या या इच्छेवर काहीच प्रतिक्रिया न देतां त्याच्या राण्या का झटकन निघून गेल्या?

त्या दोघींच्या निःशब्द प्रस्थानामुळे काहीच निश्चित होतं नव्हतं. विरोध,असहमती की तटस्थता? एक मात्र निश्चित होतं- जे मयंककेतुला समजलं होतं, त्या दोघींच्या झटकन निघून जाण्यामध्ये त्यांची नक्कीच सहमती नव्हती.

“अरे, दिव्येंदु! माझ्या या प्राणप्रिया अशा रीतीने मूकपणे झटकन का निघून गेल्या? माझा प्रस्ताव त्यांना मान्य आहे,असे मला वाटत नाही. तुला वाटतं?” मयंककेतु संचित झाला.

“मला काय वाटणार, मित्रा?

*नरेशा! काय तुझी ही गति|*

*कामदेव संचित आहे, अन् मौनमग्न आहे रति||*

*सख्या, तुझ्या हृदयस्वामिनींचे हृदयंगत |*

*आणि माझ्या प्रजावतींचे मनोगत||*

प्रगटेल कधी यथार्थात?

हे परमेश्वरा! का रचतोस शब्दांचे सारे खेळ मौनात?

परंतु दडलेले असतात मौनात अर्थ सारे,

म्हणूनचि रहस्य नकळत उलगडते रे!”

दिव्येंदुच्या उस्फूर्त काव्यपंक्तींना अडवत मयंककेतु म्हणाला “ खरंय तुझं! मित्रा! मौनात अनेक अर्थ दडलेले असतात. प्रेम, क्रोध, होकार, नकार, विरोध, असंतोष, तीव्र रोष, तटस्थता तसेच विवशता इत्यादी.”

“परंतु मला वाटतं, तुझ्या प्रियतमांच्या झटकन निघून जाण्यामागे असंतोष,रोष, विरोध व असहमतीही असू शकते.” दिव्येंदुच्या शब्दांनी धीर देण्याऐवजी उलट त्याच्या मनात शंकेचे बीज पेरले.

तो झटकन उठून आपल्या अंत:पुरात गेला. झिरझिरीत पडद्याआड त्या दोघीजणी उभ्या होत्या, निःशब्द व मूक. त्यापैकी मधुरिमा उगीचच पुष्पपात्र स्वच्छ करत होती आणि मरुषिका शांतपणे उभी होती. मात्र त्या शांततेतही अस्वस्थतेचा गंध येत होता.

“माझ्या प्रिय पत्नींहो! माझा हा प्रस्ताव तुम्हां दोघीजणींना खटकला का?” मयंककेतुने प्रश्न केला.

“अर्थातच, मला तुमचा प्रस्ताव खटकलाच आहे. आर्य, पांडवांच्या मयसभेला पासंगाला पुरेल असे सभाभवन तुम्ही निर्माण करू शकता का?” मरुषिकेने स्पष्टपणे म्हटले.

“ आर्येचे शब्द योग्यच आहेत, हे राजा! म्हणूनच मी जरा स्पष्टच बोलते. आपण मनात क्रोध धरू नये.” मधुरिमेनेही तिच्या शब्दांचे समर्थन करत म्हटले, “ तुम्ही असा महाल निर्माण करायला मायावी शक्ती कुठून प्राप्त करणार आहात? तो महाल उभारण्यात धनकोष रिक्त झाला तर? आणि त्या महालामुळे नगरीवर- आपल्या सर्वांवर संकट कोसळलं तर?”

“ तसं काहीच होणार नाही, हे माझं वचन आहे. प्रियतमे!” मयंककेतुने तिच्या हातावर हात ठेवला.

“किंतु आर्य, माझा मात्र या आश्वासनावर विश्वास नाही.” मरूषिकेने म्हटले, “मला एखाद्या महान ऋषीला भेटायला पाहिजे तुमच्या सुरक्षेसाठी.”

“अगं, तसं काही होणार नाही.” असं मयंककेतु तिला समजावत असतानाच दासी अंत:पुरात आली, “ महाराज, राजगुरूंनी तुम्हांला सभेत तत्काळ बोलावले आहे!”

“त्यांना म्हणावे, त्यांच्या आज्ञेचे पालन तत्काल होईल.” मयंककेतुने म्हटले, “निश्चितच दिव्येंदुने त्यांना सर्व काही सांगितले असेल.”

“आमच्या मते, राजगुरु नक्कीच तुम्हाला त्या इच्छेपासून परावृत्त करतील.” मधुरिमेने म्हटले.

“ते काय म्हणतात, ते पाहूया.” असं म्हणून मयंककेतु आपल्या दोन्ही भार्यांसह राजसभेत प्रवेशला. राजसभेत फक्त राजगुरुच होते.

“तू आलास, राजन्? मी तुला काहीतरी महत्त्वाचे सांगणार आहे!” राजगुरुंनी म्हटले.

“प्रणाम, राजगुरु!” मयंककेतुने आपल्या राण्यांसह राजगुरुंचे चरण शिवले.

“आयुष्यमान भव! अखंड सौभाग्यवती भव!” राजगुरुंनी आशिर्वाद दिला, “राजन्, मला फक्त तुझ्याशीच बोलायचे आहे. तू तुझ्या राण्यांना अनुज्ञा दे.”

तसा मयंककेतुने आपल्या दोन्ही प्रियतमांकडे पाहत नेत्रसंकेत केला, अंत:पुरात प्रस्थान करण्याचा.

“आज्ञा असावी.” असं म्हणून त्या दोघीजणींनी अंत:पुरात प्रस्थान केले.

त्या दोघींनी प्रस्थान केलेले पाहून मयंककेतुने विचारले, “राजगुरु, आपणांस माझी महत्वाकांक्षा कळली का?”

“होय, त्याकरिता एकच उपाय आहे, जो उपाय तुला धनाविना, परिश्रमाविना व कारागीरांविना एक मायावी महाल देईल.” राजगुरुंचे शब्द ऐकून तो प्रसन्न झाला, “तो कोणता उपाय आहे?”

“तुला दूरवरच्या स्वरामंत्रक नामक वनात जावे लागेल. तेथे एक मायाकार राहतो. त्याला सर्वजण ‘निशामणी’ या नावाने जाणतात. कारण त्याची अघोरी कार्ये रात्रीच सुरू होतात. त्याची एकच इच्छा पूर्ण केली, तर तो आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो. कधी- कधी त्याची इच्छा इतकी विचित्र असते,की कधी- कधी लोक त्याच्याकडे जातदेखील नाहीत.” राजगुरुंनी म्हटले, “जर त्याची इच्छा तुझ्या प्रतिष्ठेला ठेच पोहोचणारी असेल, तर मी दुसरा उपायही सांगतो.”

राजगुरु पुढे काही सांगणार, इतक्यात मयंककेतुने म्हटले,” माझ्याकडे कोणत्याही वस्तूचाच अभाव नाही. त्यामुळे मी ‘निशामणी’ ची कुठलीही इच्छा पूर्ण करेन.”

असं म्हणून राजगुरुंशी काहीच न बोलता तो लगेच रथागारात गेला. त्याने आपल्या रथाला जोडलेल्या एका अश्वाचे वेग सोडविले व तो त्या अश्वावर आरुढ झाला.

हे पाहून त्याच्या सारथ्याने विचारले, “महाराज! आपण हे काय करताहात? जर आपल्याला रथाने जायचे असेल तर, मला सांगायचे होते. आपण तसदी का घेता?”

“नाही, मला एकट्यानेच जायचे आहे.” असं म्हणून मयंककेतुने घोड्याला टाच मारली.

सारथी काही प्रश्न करणार तितक्यात, मयंककेतुचा अश्व दौडत निघाला.

त्याचा तो अश्व मरुषिका व मधुरिमेनेही पाहिला. त्या दोघींच्याही मनात एकच प्रश्न आला, आर्यपुत्र अश्वावर आरुढ होऊन इतक्या घाईघाईतच कुठे निघून गेले?

“तुला काय वाटतं,मधुरिमे? राजन् इतक्या घाईने कुठे निघून गेले असतील?” मरुषिकेने विचारले.

“मीही तोच विचार करत आहे,आर्ये!” मधुरिमेचे उत्तर.

“आपण हे राजनच्या सारथ्यालाच विचारले पाहिजे.” मरुषिकेने दासीला बोलावले, “राजनच्या सारथ्याला बोलावून आण.”

........ आणि काही क्षणांत राजसारथी उपस्थित झाला !

“महाराणी, आज्ञा असावी!” त्याने म्हटले.

“महाराज इतक्या घाईघाईत कुठे निघून गेलेत?” मरुषिकेचा प्रश्न!

“अन् तू त्यांना जाऊच कसं दिलंस?” मधुरिमेनेही कठोर स्वरात विचारले.

“देवी, क्षमा असावी. मी काही विचारण्यापूर्वीच राजन् निघून गेले.”

“जाण्यापूर्वी त्यांनी तुला काही सांगितलं का?” मरुषिकेने म्हटले.

“महाराणी! त्यांनी इतकेच म्हटले, “मला एकट्यानेच जायचे आहे.” सारथ्याने म्हटले.

“ठीक आहे. तू आता जाऊ शकतोस आणि जातां- जातां सेनापती अरिहंताला पाठवून दे.” मरुषिका काहीतरी विचार करत होती.

“सेनापतींना? का?” मधुरिमेने जिज्ञासेपायी म्हटले.

“ते तुला कळेलच.” असं मरुषिका बोलतानाच सेनापती अरिहंत आला.

“महाराणी, आपण माझे स्मरण का केलेत?”

“सेनापती, आपण आपलं सैन्य महाराजांच्या सुरक्षार्थ पाठवा. महाराज आपल्या अश्वावर आरुढ होऊन कुठे जाताना दिसले तरी, त्यांचे अनुसरण करण्याची व त्यांचे रक्षण करण्याची आज्ञा सैन्याला द्या.” मरुषिकेने म्हटले.

“जशी आज्ञा, देवी. अजून काही आदेश ?” अरिहंत मान लवून म्हणाला.

“ मी एका विशिष्ट क्षेत्री जात आहे. तुम्हीही माझ्यासमवेत यावे.” असं म्हणून मरुषिका मधुरिमेकडे वळली, “मी त्या विशिष्ट स्थानी जाऊन आपल्या राज्यात परतेपर्यंत संपूर्ण राज्यव्यवस्थेतील मदार तुझ्यावर आहे, हेच लक्षात असू दे.”

मधुरिमेला अशी सूचना देऊन मरुषिकाही राजाप्रमाणेच काहीच न सांगता सेनापतीसोबत रथातून निघून गेली. हे पाहून मधुरिमा चिंतित झाली.

“आर्याही राजनप्रमाणेच काहीच न सांगता अचानक कुठे निघुन गेली असावी? तिच्या अचानक निघून जाण्यामुळे माझी चिंता द्विगुणित झाली आहे. इथे राजनचा पत्ता नाही आहे अन् ही आर्याही कुठल्या अज्ञात स्थानी गेली, हे देवासच ठाऊक! गेली तर गेली, माझ्यावर राज्यव्यवस्थेची जबाबदारी टाकून गेली. त्यामुळे मी तिच्या शोधार्थ तिच्यामागे जाऊही शकत नाही.’

असा विचार करतां- करतां संध्याकाळ झाली. तरीही मरुषिका परतली नव्हती. त्यामुळे मधुरिमा चिंतित झाली.

काही वेळाने मरुषिका परतली. ती महालात येताच मधुरिमेने तिच्यावर प्रश्नांची सरबत्तीच सुरू केली, “आर्ये! तू इतका वेळ कुठे गेली होतीस? तू राजनच्या मागे गेली होतीस का?तू काहीच का सांगितले नाहीस? कुठल्या

अज्ञात स्थळी तू गेली होतीस, तर मला चिंता वाटली होती; मी किती तणावग्रस्त होते!"

"अगं, थांब." मरुषिकेने दमश्वास घेतला. "मी दिवसभरात काहीच खाल्लं-प्यालं नाही. आधी मला श्वास घेऊ दे व भोजनही."

" मीदेखील भोजन केले नाही. चल, आपण दोघीजणी एकत्रच सहभोजन करु." मधुरिमेने दासीला भोजनाची पात्रे आणण्याचा आदेश दिला.

"बरं आर्ये! तू कुठे गेली होतीस?" मधुरिमेने भोजन ग्रहण करता करता विचारले.

"मी राजर्षी इंद्रनील यांच्या आश्रमात गेले होते. त्यांच्या आश्रमापर्यंतच पोहोचायलाच मला दुपार लागली. मी त्यांची पाद्यपूजा करून त्यांना विचारले, " ऋषिवर, माझ्यावर कृपा करावी. माझा पती- राजा मयंककेतु कुठे आणि कशासाठी गेला आहे, हे सांगण्याची आपण कृपा कराल?"

त्यांनी म्हटले, "अवश्य".त्यांनी आपले डोळे मिटले.

काही क्षणांनी राजर्षिंनी डोळे उघडले, "तुझा पती दूरवरच्या स्वरामंत्रक नामक वनाकडे अग्रसर आहे. मात्र या अपरिचित वनाकडे जाताना त्याचे

मन विचलित नाही. त्याच्या हृदयात महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याची आशा व्यापलेली आहे.”

“त्या वनाविषयी आपण काही सांगू शकाल?”

“फारच मायावी वन आहे. कुण्या एका मायाकाराने आपल्या शब्दांनी फुंकलेले, संमोहित केलेले आहे ते.” असं म्हणून राजर्षिंनी मला सूचित केले, “तुला स्वतःच्या पतीचे रक्षण करावेसे वाटले, तरी तू तेथे जाऊ नकोस. कारण तिथल्या मायेत तूच भ्रमित होईल. म्हणून तू आपल्या पतीकरिता विशिष्ट व्रत कर. तुझ्यासह राजाची दुसरी पत्नी असायला हवी, हे व्रत करताना. ह्या व्रताच्या प्रभावाने तुझ्या पतीवर मायेचा परिणाम होणार नाही.” असे म्हणून मरुषिकेने सर्व काही सांगितलं.

“हे व्रत उद्याच ब्राह्ममुहूर्ताला आपण प्रारंभ करूया.” मरुषिका म्हणाली.

ठरवल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशीच्या ब्राम्हमुहूर्ताला त्या दोघीजणी स्नान करून एकवस्त्रा अवस्थेत अन्विता नदीच्या तीरी आल्या. त्यांच्यासमवेत त्यांच्या दासी व अंगरक्षकाही होत्या.

मरुषिका व मधुरिमेने नदीमध्ये आचमन करुन व्रतास आरंभ केला. जलात उभे राहून विशिष्ट मंत्राचा उच्चार करून त्या दोघीजणी फुलांची आहुती देत होत्या, तेही जलातच.

आणि काही वेळाने त्या दोघीजणींनी एक श्रीफळ कुंकूवाने मंत्रित करून ते एका गडद जांभळट वस्त्रात बांधून नदीच्या तीरावरील माती उकरुन त्यात ठेवून दिले अन् त्यावर रंगीत दगड ठेवला.

“हा दगड कशासाठी ठेवयचा, आर्ये?” मधुरिमेचा प्रश्न.

“मधुरिमे! हे श्रीफळ चार दिवसांनंतर व्रताच्या उद्यापनावेळी नदीत सोडून द्यायचे असते. त्यामुळेच मी ते श्रीफळ नदीच्या तीरी ठेवले आहे.”

“आर्ये, हा दगड कोणी उचलला तर?”

“अगं, म्हणूनच तर तो दगड राजर्षिंनी अभिमंत्रित करुन ठेवायला सांगितला होता ना!” मरुषिकेने म्हटले, “चल, आपण व्रतानुसार फलाहार करुया नि रात्री पक्वान्ने ग्रहण करुया.”

अशा रीतीने त्या दोघी राण्यांची आपल्या पतीचे रक्षण करण्याची धडपड चालूच होती. मात्र त्या दोघी राजस्त्रियांना याची कल्पना नव्हती की, त्यांचा पती नेमकं काय करत आहे.

अशाच व्रतसाधनेमध्ये तीन दिवस उलटले. राज्यावर चिंतेचं सावट होतं. कारण राज्याचा नरेश अजूनही परतला नव्हता.

मरुषिका अन् मधुरिमा- मयंककेतुच्या दोन्ही राण्या चिंतेत होत्या. त्या दोघींच्या येरझाऱ्या सुरू होत्या, सौंधातच. किमान दहा वेळा तरी त्यांनी वाकून वाकून पाहिलं असेल.

सैन्य तर नगरात कधीच प्रवेशले होते. परंतु राजाचा काही ठावठिकाणा नव्हता. राजा कधी परतेल ह्याचीच चिंता लागून राहिली होती, राण्यांना.

........ आणि दुःखाच्या याच घडीला वाद्यांचा घोष त्या राण्यांच्या व नगरजनांच्या कानांवर पडला. याचाच अर्थ, मयूरशिखा नगरीचा राजा मयंककेतु नगरीत परतला होता.

मयंककेतु जसा नगरात प्रवेशला, तशा त्याच्या दोन्ही भार्या त्याच्या स्वागतार्थ धावत आल्या.

तेव्हा त्याने पाहिले, त्याच्या राण्या खंगलेल्या दिसत होत्या.

“आपल्या पतीशिवाय माझ्या राण्यांना अन्नपाणी जात नव्हतं का?” त्याने लाडिक स्वरात विचारले.

“तसं नाही. आम्ही तुमच्या सुरक्षेकरिता व्रत करत आहोत.” मरुषिकेने म्हटले.

“काय?” मयंककेतु चमकलाच. त्याला शंका आली, या दोघींना राजगुरूंनी तर सर्व काही सांगितले नसेल ना!

“काय झालं? तुम्ही चमकलात का?” मधुरिमेने म्हटले.

“म्हणजे इतकं सर्व करण्याची काय आवश्यकता होती? उगीच स्वतःच्या देहांना कष्टवण्याची काय गरज होती?” मयंककेतुने स्वतःला सावरत म्हटले.

“चला,आपण सर्वप्रथम विश्रांती घ्यावी.” मरुषिकेने वेळेचे भान ठेवत म्हटले, “चल, मधुरिमे! आपण आर्यपुत्रांची शयनाची व्यवस्था करूया.”

“अवश्य, आर्यपुत्र! आपण सर्वप्रथम स्नान करावे, भोजन करावे, त्यानंतर शयन.” असं म्हणून मधुरिमेने दास्यांना उष्ण स्नानकुंडाची व्यवस्था करण्याची आज्ञा केली.

तसे मयंककेतुने शुचिर्भूत होऊन भोजन ग्रहण केले आणि तो तोंडात पानविडा चघळत मंचकावर पहुडला.

त्याक्षणी मधुरिमा त्याला वारा घालू लागली. त्यामुळे त्याची तंद्री भंगली. त्याने तिला महालातून जाण्याचा संकेत केला. तशी मधुरिमा महालातून निघून गेली.

ती निघून गेलेली पाहून मयंकेतु पुन्हा आपल्याच विचारांत गढला. त्याला त्या दिवशीचा संपूर्ण प्रसंग आठवला, जेव्हा तो ‘निशामणीला' भेटायला गेला होता.

ज्याक्षणी तो स्वरामंत्रक नामक वनामध्ये प्रवेशला होता, त्याक्षणी त्याला घुबडांचे घूत्कार, तसेच वेगवेगळ्या प्राण्यांचे चित्कार ऐकू आले होते.

तरीही मयंककेतु धैर्य बांधत त्या पर्णकुटीकडे चालत जात होता. तेव्हा त्याच्या कानाजवळ फडफड जाणवली. त्याने पाहिले, वटवाघळे उडून गेली होती इतक्या दुपारी वटवाघळे?

तितक्यात त्याला दिसले, नेहमीप्रमाणे एखाद्या बालकाप्रमाणे रडणारे धनुष्यपक्षी इथे हसत- खेळत गीत गात होते.

त्याला काहीच कळेना, त्याने त्या झोपडीचे दार  खटखटवले, तेव्हा त्याला कळले की त्याचा हात त्या दारात रुतला आहे.

तसा तो स्वतःही त्या दारातून आरपार गेला. तेथे त्याने पाहिले, तिथे एक व्यक्ती आपल्या मायावी शक्तीने पाण्याचे थेंब हवेत फिरवत होता.

तो निश्चितच निशामणी असेल, असा मयंककेतुने  विचार केला.

"निशामणीच ना?"

" तू मयुरीशिखा नगरीचा राजा मयंककेतुच ना?" निशामणीने विचारले.

"तुला कसं कळलं, निशामणी?"

"ज्याक्षणी तू माझ्या वनात प्रवेश केला, त्याक्षणीच तू कोण आहेस, तुझा हेतू काय आहे, तुझी इच्छा काय आहे, तू कुठले विचार करत होतास, हे सर्व मी जाणून घेतले होते, आपल्या मायेच्या सहाय्याने."

"तर सांग, निशामणी! मी तुला कुठले कार्य सोपवणार आहे?"

"हे राजा! तुला पांडवांप्रमाणेच मायावी सभाभवन निर्माण करण्याची महत्वकांक्षा आहे. ती महत्वकांशा मी पूर्ण करेन. मयसभेप्रमाणे नव्हे,परंतु मी मायावी महाल निर्माण करेल परंतु त्यासाठी....."

" त्यासाठी मला तुझी एक इच्छा पूर्ण करायची आहे ना? बोल ना."

राजाचे शब्द ऐकून निशामणीने डोळे मिटले. पुनः डोळे उघडत तो म्हणाला, "तुझ्या दोन्ही पत्नींपैकी एक पत्नी. मला तू ती पत्नी महालाचं कार्य पूर्ण होईपर्यंत द्यावीस."

मयंककेतु विचार करत होता, त्याला तर तसा मायावी महाल बांधण्याची महत्वकांक्षा होती व ती आकांक्षा पूर्ण करायचीच होती!

परंतु कुठल्या पत्नीला ठेव म्हणून द्यावं? कारण आपल्या दोन्हीही राण्या आपल्याला प्रिय आहेत. त्या दोघींवरही आपले प्रेम आहे. त्या दोघीजणींनी आपल्या सुरक्षेकरिता व्रतही केले होते.

जेव्हा- जेव्हा मयंककेतु त्याच बाबीचा विचार करत होता, तेव्हा- तेव्हा त्याच्या मनात मरुषिकेचेच नाव उमटत होते. कारण मधुरिमेच्या मधुर स्वभावपुढे मरुषिकेचा अनुशासनप्रिय स्वभाव त्याला कडूच वाटायचा.

परंतु हे सर्व मरुषिकेला कसं सांगावं? ती निश्चितच क्रुद्ध होईल आणि मधुरिमेच्या मनातूनही आपण उतरून जाऊ.

म्हणून वनविहाराच्या किंवा मृगयेच्या निमित्ताने मरुषिकेला मायाकाराकडे पाठवून देऊया.

परंतु निशामणीने आपल्याकडे आपल्या एकाच पत्नीची का मागणी केली? त्याला माझ्या पत्नीच्या सौंदर्याची लालसा आहे की त्याच्या मागणीमागे अन्य कुठलेही कारण आहे?

मयंककेतुने तोंडातील पान काढून टाकले आणि दासीकरवे मरुषिकेला बोलावणे धाडले.

तिला बोलावणे धाडल्यानंतर त्याला शंका आली, आपल्या वनविहाराचा प्रस्ताव मान्य असेल ना मरुषिकेला?

तितक्यात मरुषिका आली, “आर्यपुत्र! आपण ठीक तर आहात ना? आपण मला कशाला बोलावलेत?”

मयंककेतुने एका हाताने दार लोटत व दुसऱ्या हाताने त्याने तिला जवळ घेत कुजबुजत म्हटले, “मी तुला एक आनंददायक बातमी देणार आहे.”

“थांबा, मी मधुरिमेलाही बोलावते.” मरुषिका म्हणाली.

“नाही, तू मधुरिमेला बोलावू नकोस. कारण माझ्या सुरक्षितपणे परतण्याचे श्रेय फक्त तुलाच आहे, मरुषिके!”

"आर्यपुत्र! हे काय? आपण मधुरिमेला या श्रेयातून का वगळताहात? तिला व्रताची सवय नव्हती, तरीही तिने माझ्या म्हणण्यानुसार हे महाकठीण व्रत केले आहे म्हणजे करत आहे."

"परंतु या व्रताचे श्रेय तुलाच जाते. कारण तू माझी ज्येष्ठ पत्नी आहेस. याशिवाय या व्रताची प्रेरणाही." मयंककेतुने कधी नव्हे, तर आज मरुषिकेची वारेमाप स्तुती केली होती.

"तरीही मधुरिमेने या व्रतास नकार दिला नाही, तिनेही तुमच्या चिंतेखातर हे व्रत केले आहे." मरुषिका त्याचा तर्क वारंवार खोडत होती, हे पाहून मयंकेतुला क्रोध आला, "म्हणजे तुला आपल्या पतीचे म्हणणे चुकीचेच वाटते राहते तर ! याला काय अर्थ आहे? मी तुझी प्रशंसा करतोय, अन् तू?"

"आर्य, क्षमा असावी. आपण बोलावे." मरुषिकेने स्वतःची पडती बाजू सावरत म्हणाली.

"तू माझ्यासाठी इतके केलेस, म्हणून मी तुला एक उपहार देणार आहे. फक्त तुलाच. कारण मी मधुरिमेला वारंवार उपहार दिलेले आहेत."

"उपहार? पण फक्त मलाच का?"

"कारण तू व्रतामुळे अत्यंत खंगलेली आहेस.तुला प्रसन्न- प्रफुल्लित करण्यासाठी तुला वनविहारासाठी नेण्याचा माझा मानस आहे." मयंककेतुने म्हटले.

"फक्त मलाच? मधुरिमेलाही आपण सोबत नेऊया." मरुषिकेचे पुन्हा तेच पालुपद ऐकून मयंककेतुने शांतपणे म्हटले, "मी द्वितीय विवाहानंतर कधीतरी तुलाच हा उत्तम उपहार दिला आहे,तरी तो उपहार तुला स्वीकारार्ह वाटत नाही?"

हे ऐकून मरुषिका विचारांत पडली. तिने अनिश्चिततेने मान हलवली व ती निघून गेली. तिचे मान हलवणे मयंककेतुला होकारार्थी वाटले किंबहुना, त्याने तसेच गृहित धरले.

मात्र मरुषिका गेली होती, थेट मधुरिमेकडेच! तेव्हा मधुरिमा व्रताकरिता पूजेची थाळी तयार करत होती.

"आर्ये, तू अकस्मात? काय झालं, फलाहार करायचा नाही का?"

"मला एका प्रश्नाचे उत्तर दे." मरुषिकेने दुसऱ्या थाळीतली फळे घेत म्हटले, "तू तुझ्या विवाहाच्या उपरांत या दोन वर्षांतील असा कुठलाही मास सांग, ज्या महिन्यातील पहिल्या पाच दिवसांत व शेवटच्या पाच दिवसांत राजनने तुला उपहार दिला नाही?"

“मी हे सांगू शकत नाही. कारण या उपहारामुळेच माझ्याकडील चार-पाच मोठ्या पेट्या भरून गेल्या आहेत.” मधुरिमेने प्रश्न केला, “मात्र असं का विचारतेस?”

“आर्यपुत्रांनी मला एक उपहार दिला आहे. मात्र तुला वगळले गेले आहे, मधुरिमे!”

“काय? पण असा कोणता उपहार दिला आहे आर्यपुत्रांनी? ”

“वनविहाराकरिता आर्यपुत्र मलाच नेणार आहेत. तुला नाही.” मरुषिकेचे शब्द ऐकून मधुरिमा चिंतित झाली, “माझ्यावर रुष्ट झाले आहेत का ते?”

“काय माहीत, परंतु या व्रताचे श्रेय राजन मलाच देताहेत. पण त्यांनी तुला का वगळलं? ” मरुषिका म्हणाली.

“का? असं का केलं आर्यपुत्रांनी? तुम्ही दोघे वनविहाराला जाणार अन् मी व्रतस्थ राहून या राजमहालात आपला देह शीणवणार! हे कितपत योग्य केलं आर्यपुत्रांनी?” मधुरिमा दुःखी झाली.

“तू दुःखी होऊ नकोस. मी आर्यपुत्रांना विचारून बघते. जर त्यांनी संमती दिली नाही तरी, मी तुला माझ्यासमवेत नेईन.” मरुषिकेने मधुरिमेला धीर दिला.

“पण त्यांनी तुलाच नेण्याचा निर्णय का घेतला? यात नक्कीच पाणी मुरतंय.” मधुरिमेने म्हटले.

“मलाही यात संशयास्पद वाटतंय.” मरुषिकेने तिला दुजोरा दिला.

“आर्ये! आपण पुनः राजर्षि इंद्रनीलांकडे जायचं का?”

“नाही. आर्यपुत्र आपल्याला जाऊ देणार नाहीत. कारण उद्याच वनविहाराला जायचं आहे, असा आर्यपुत्रांचा आग्रह आहे.” मरुषिका विवंचनेत पडली.

“उद्या आपल्या व्रताची सांगता आहे ना! तर?” मधुरिमेने चिंतेने म्हटले.

“उद्या आपण पाहू, व्रताच्या सांगतेचं काय करता येतं का ते.” मरुषिका असे म्हणाली खरी, मात्र दुसऱ्या दिवशीच काहीच निश्चित नव्हतं.

दुसऱ्या दिवशी राजर्षी इंद्रनीलांनी सांगितल्याप्रमाणे त्या दोघीजणी स्नानानंतर दुपारी अन्विता नदीच्या तीरावर गेल्या. मरुषिकेने नदीच्या तीरावरची माती उकरून त्यातील श्रीफळ बाहेर काढले. ती श्रीफळ पाण्यात सोडणार, इतक्यात तिच्या पतीचा स्वर तिच्या कानी पडला.

“चल, वनविहाराकरिता रथ सज्ज आहेत. तू विधी पूर्ण करून ये.”

“थांबा, मी आलेच. मला अजून एक रथ सज्ज करायचा आहे.” असे म्हणून मरुषिकेने आपल्या हातातील श्रीफळ मधुरिमेच्या हातात दिले.

"हे श्रीफळ मी अर्पण करू? आर्ये?"

"हो, काहीच हरकत नाही. मी तुझ्याकरिता रथ सज्ज करून आलेच." असं म्हणून मरुषिका रथागारात निघून गेली.

तेव्हा मधुरिमेने श्रीफळाची पूजा केली व श्रीफळ नदीत सोडण्यासाठी नवे वस्त्र घेतले.

इतक्यात हवेचा मोठा झोका आला. तो झोका नव्हता, मात्र एखादी वावटळ म्हटल्यास वावगे ठरणार नाही, अशी जोरदार हवा होती ती. ती हवा मधुरिमेभोवती फिरली अन् मधुरिमेचे हात-पाय अदृश्य शक्तीने बांधले गेले.

....... आणि त्या हवेने तिला खेचून अन्यत्र कुठेतरी न्यायला सुरूवात केली.

काही वेळाने मरुषिका आली. मरुषिकेने पाहिले, मधुरिमा अन्विता नदीच्या तीरावर नव्हतीच, त्यामुळे मरुषिकेला धक्काच बसला.

"मधुरिमा कुठे आहे? दासींनो व अंगरक्षिकांहो!"तिने विचारले. दासीने तिला सर्व काही सांगितले.

ते ऐकून मरुषिका भयभीत झाली. मात्र तिने वेळेचे भान राखत सर्वप्रथम तो विधी पूर्ण केला.

अचानक तिला समोरच्या झाडीमध्ये काहीतरी पडल्याचा आवाज आला.

“समोर काय पडलंय?” मरुषिका म्हणाली.

“मी पाहून येते, महाराणी.” दासी अंगरक्षिकेसोबत समोरच्या झाडीत गेली.

........ आणि काही क्षणांत दासी व अंगरक्षिकेने एका व्यक्तीला उचलून आणलं.

“हे काय आहे? माझी मधुरिमा?” जखमी व अचेतन मधुरिमेला पाहून मरुषिका हादरली व स्वतःही अचेतन झाली.

त्या दोन्ही अचेतन राण्यांना पाहून दास्यांनी मयंककेतुला राण्यांविषयी सांगितले. त्याला वनविहार करण्याचा बेत निरस्त करण्यासाठी करण्याची विनंती केली.

“नाही.” मयंककेतु पुटपुटला, “हीच वेळ आहे, मरुषिकेला मायाकाराकडे नेण्याची!”

“तुम्ही सर्व मधुरिमेला घेऊन वैद्याकडे न्या. मीही मरुषिकेला घेऊन येतो.” त्याने दासींना आज्ञा दिली.

दास्या मधुरिमेला नेताना पाहून मयंककेतुने मरुषिकेला उचलून अश्वावर आरुढ होऊन गुप्तमार्गाने स्वरामंत्रक वनाकडे दौड मारली.

काही वेळाने वन आलेलं पाहून मयंककेतु मरुषिकेला घेऊन अश्वावरून उतरला अन् त्या वनात प्रवेशला. त्याने पाहिले, मरुषिकेची शुद्ध अजूनही हरपलेलीच होती. घोडदौडीच्या प्रवासामुळेही तिला जाग आली नव्हती.

त्याने मनोमन दैवाचे आभार मानले. त्याने वनात प्रवेश केला. आश्चर्य म्हणजे स्वरमंत्रकातून प्रकाशाचे कवडसे येत होते. दुपारी भिरभिरणारी वटवाघळेही वृक्षांना लटकून निद्रा घेत होती. त्यादिवशी आनंदाने गीत गाणारे धनुष्यपक्षीही बालकाप्रमाणे पुन्हा रडू लागले होते,आपल्या सहगामीच्या विरहात.

ते सर्व पाहून मयंककेतु चकित झाला हे खरं, परंतु त्याविषयी विचार करायला त्याच्याकडे वेळ नव्हता. मरुषिका जागी होण्याच्या आतच मयंककेतु तिला घेऊन त्या मायाकाराच्या पर्णकुटीजवळ गेला. त्याने त्या पर्णकुटीचे दार खटखटवले,मात्र त्याचा हात त्या दारात रुतला नाही.

त्याने असमंजसपणे दार पुन्हा खटखटवले आणि निशामणीने दार उघडले.

“राजन, तू?” त्याचा क्षीण स्वर.

“निशामणी, तुला काय झालंय? तू असा काय बोलतोस?”

“स्वतः करूनसवरून मलाच वेठीस धरतोस, राजा?”

“म्हणजे? मी समजलो नाही.”

“तुझ्या दोन्ही राण्यांनी जे व्रत केले आहे ते व्रत तुझ्या सुरक्षेकरिताच नव्हे, तर माझ्या मायावी शक्तींना नष्ट करण्यासाठीही होते. त्यामुळेच मी तुझ्याकडे तुझी एक पत्नी मागितली.”

“काय? मयंककेतु चकित झाला.

“होय! म्हणून पूर्णाहुती देऊ पाहणाऱ्या मधुरिमेचे अपहरण मीच करू पाहत होतो. मात्र त्याजागी मरुषिकेने श्रीफळ अर्पण केले. त्याकारणे.......

“काय झालं, त्यामुळे?” मयंककेतुचा प्रश्न.

“त्यामुळेच माझ्या मायेचा प्रभाव नष्ट झाला.” निशामणीने दुःखाने म्हटले.

“आणि मायावी महालाचं काय?” मयंककेतुने अधीरतेने विचारले.

“क्षमा कर राजा! जर मायावी शक्ती नसेल, तर मायावी महाल कसा निर्माण करता येईल?” निशामणीने म्हटले, “आता तु जाऊ शकतोस.”

असं म्हणून त्याने आपले दार बंद केले.

आता मयंककेतुला पश्चाताप वाटत होता, की त्याने राजगुरूंचा दुसरा उपाय ऐकायला हवा होता, नाहीतर अशी वेळच आली नसती. या विचाराने मयंककेतु विषन्न झाला.

आपल्या स्वार्थाकरिता, महत्वाकांक्षेकरिता आपल्या पत्नीचा, नगरीचा तसेच लोक धनाचा बळी देऊ पाहणाऱ्या त्या राजाचे स्वप्न अपुरे राहणार होते,

कदाचित......!

# परिशिष्ट

1. दवण :- सुगंधित फुलांच्या वेलीची एक प्रजात, जी उंच ठिकाणी वाढते.
2. रात्रपक्षी :- रात्रीच आपल्या घरट्याबाहेर पडणारा पक्षी.
3. राणी पाकोळी :- नीलवंती प्रजातीचे फुलपाखरू.
4. अचेतन :- शुद्ध हरपलेला किंवा बेशुद्ध.
5. श्वेतपंखी रुपस पक्षी :- फुलपाखरे व पाकोळ्या खाणारा पोटू पक्षी.
6. पाकोळी :- फुलपाखराप्रमाणे पंख असणाऱ्या, मात्र भुरे पंख असणाऱ्या प्रकाशजीवी कीटकांची प्रजात.
7. पूर्वस्मृती :- पूर्वीच्या स्मृती.
8. स्वर्गसुंदरी :- स्वर्गातील अप्सरा.
9. नखाग्र :- नखावरील पांढरा भाग.
10. निरुपाय :- नाईलाज.
11. पारध (पक्ष्याचे) :- पक्ष्याला फासात (सापळ्यात) किंवा जाळ्यात पकडणे.
12. पुष्पवाटिका :- फुलझाडांचे उद्यान.
13. मंगलवस्त्रे :- विवाह, यज्ञ, उपनयन अशा शुभकार्याच्या वेळी परिधान करावयाची वस्त्रे.
14. झिरझिरीत :- पारदर्शक.
15. दिवास्वप्न :- काल्पनिक तंद्री.

16. टाक :- लोहाची लेखणी.

17. भूर्जपत्र :- भूर्जवृक्षाच्या सालीपासून निर्माण केलेले पान.

18. सामंत :- सुभेदार.

19. वल्गना ;- बढाई.

20. तात्कालिक :- झटकन.

21. तावदान :- खिडकी.

22. रथस्तंभ :- रथाला असलेले चार स्तंभ, ज्याच्या साहाय्याने योध्दा शत्रूच्या बाणांपासून स्वतःचे रक्षण करु शकतो.

23. नीलघंटी :- घंटेप्रमाणे आकार असणाऱ्या निळ्या फुलांची प्रजात.

24. स्कंध :- खांदा.

25. चांदवा :-चांदण्याची नक्षी असणारे रंगमंडल.

26. दशग्रंथी ब्राह्मण :- दहा प्रकारचे शास्त्रांचे ज्ञान अर्जित केलेले ब्राह्मण.

27. मेणा :- तीन- चार व्यक्ती बसू शकतील, इतकी मोठी पालखी.

28. विहंग :- (राजकुमाराच्या नावाचा अर्थ) पक्षी.

29. अणकुचीदार :- टोकदार व धारदार.

30. पारा :- एक असा धातु, पांढरा असून चकाकतो.

31. मत्स्यागंना, मत्स्यनारी, जलकन्या:- जलपरी.

32. खवले :- माशाचे पुढील पर, ज्यांच्या साहाय्याने मासा श्वास घेतो.

33. प्रहर :- यामाचे युग्म (जोडी).

34. डोलकाठी :- नावेच्या शिडाला असलेली काठी.

35. जिवणी :- ओठ.

36. ओलेते :- ओली वस्त्रे.

37. जलमानव :- असा जलचर जीव, ज्याचे धड मनुष्याप्रमाणे असते आणि कमरेखालील भाग माशाप्रमाणे असतो.

38. कंकणबंधन :- विवाहातील असा विधी, ज्या विधीमध्ये पती पत्नीला हळकुंड बांधलेले व दुधात बुडवलेलं रक्षासूत्र बांधतो. काही काही परंपरांत छोट्या छोट्या शंखांचे सूत्र किंवा रुद्राक्षाचे सूत्र बांधले जाते.

39. सारंगी वाद्य :- सतारप्रमाणे असलेले एक तंतुवाद्य.

40. आहत :- जखमी.

41. आपत्ती :- (येथे अर्थ) हरकत.

42. दुष्कर :- कठीण.

43. आभासी जलकुंड :- मयसभेतील मायावी जलकुंड, ज्यातील पाणी जमिनीप्रमाणे भासते.

44. अभिशप्त :- शापित.

45. संप्रेषित :- प्रसृत.

46. राजभोग :- दुधापासून तयार केलेला एक केशरयुक्त राजसी पदार्थ.

47. प्रजावती :- वहिनी.

48. धर्मकार्पण्य :- धर्माविषयीची संकुचित विचारधारा.

49. आर्या :- ज्येष्ठ सवतीला उद्देशून वापरला जाणारा शब्द.

50. संचित :- चिंतित.

51. अंत:पुर :- राणीवशा.

52. पुष्पपात्र :- फुलदाणी.

53. अनुज्ञा:- आज्ञा.

54. मायाकार :- मायावी शक्तींचे ज्ञान असणारा.

55. वेग :- दोर.

56. ब्राम्हमुहूर्त :- देवकार्य आणि व्रतांकरिता शुभ असलेला मुहूर्त.

57. राजर्षी :- क्षत्रियवर्णी ऋषी.

58. एकवस्त्रा :- स्नानानंतर परिधान केले जाणारे वस्त्र.

59. सौंध :- गच्ची.

60. धनुष्यपक्षी :- ज्याचे पुच्छ धनुष्याकृती असते व जो आपल्या जोडीदाराच्या विरहामध्ये रडतो, अशा सारंग पक्ष्यांची प्रजात.

61. प्रफुल्लित :- प्रसन्न.

62. पालुपद :- वारंवार तेच बोलणं.

63. वावटळ :- वादळाचं लहान स्वरुप.

64. सहगामी :- साथीदार किंवा जोडीदार

65. वेठीस धरणे :- गृहित धरणे किंवा आरोप करणे.

66. पूर्णाहुती :- व्रतातील किंवा यज्ञातील अंतिम आहुती.


67. लोकधन :- सार्वजनिक धनभांडार.


68. धनकोश :- खजिना.


***माझ्या या कथा वाचून कशा वाटल्या, याविषयी प्रतिक्रिया देण्यासाठी मला [shaktileelanikita@gmail.com](mailto:shaktileelanikita@gmail.com)***

***या इमेल आयडीवर रिप्लाय द्या.***

## निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके




पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा









**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे सातवं पुस्तक.**

निकिता राजेश पाटील ही मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळ्या रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम

बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?